# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. MAHMAR 2023/84526

प्रजासत्ताक दिन निमित्त सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा.!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ११ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



## वाह! भारतानं एक स्वप्न पूर्ण केलं; जगातील सर्वात उंच ब्रिजवरून धावली भारतीय रेल्वे

### ही ट्रेन फक्त वेगवान नाही तर त्यात विमान प्रवासासारख्या सुविधाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५श्रीनगर**

जम्मू काश्मीरमध्ये वंदे भारत ट्रेन धावण्याचं स्वप्न अखेर पूर्ण होत आहे. शनिवारी २५ जानेवारीला भारतीय रेल्वेने ही यशस्वी चाचणी घेतली आहे. सकाळी ८ वाजता कटरा स्टेशनहून वंदे भारत ट्रेन रवाना झाली ती अवघ्या ३ तासांत श्रीनगरला पोहचली. यावेळी रेल्वे स्टेशन परिसर भारत माता की जय या घोषणेनं दुमदुमला. १६० किमी प्रति वेगाने आरामदायक आणि वेगवान प्रवास पूर्ण केला. जम्मू काश्मीरमधील थंड वातावरण पाहता विशेष काळजी घेण्यात आली होती.

ही ट्रेन काश्मीरच्या थंडगार वातावरण प्रवास करण्यास सक्षम आहे. यातील कोच आणि बाथरूम इथं हिटर लावण्यात आले आहेत. ट्रेनच्या ड्रायव्हर केबिनमध्ये ट्रिपल एअर विंडशील्ड लावण्यात आली आहे. ज्यात मायनस तापमानातही विजिबिलिटी चांगली राहील. हिटिंग सिस्टमने पाण्याची टाकी आणि बायो टॉयलेट बसवले गेलेत. त्याशिवाय ट्रेनच्या इंजिनमध्ये बर्फ जमा होण्याची शक्यता नाही. हायटेक ट्रेन काश्मीरच्या बर्फाळ प्रदेशातून सहजपणे प्रवास करू शकेल.



**प्रवाशांसाठी उत्तम सुविधा**

वंदे भारत ट्रेनमध्ये प्रवाशांसाठी अत्याधुनिक उत्तम सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यात बायो वॅक्यूम टॉयलेट, सेंसर वॉटर टॅप, फोल्डेबल स्नॅक टेबल यांचा समावेश आहे. ट्रेनमध्ये ३६० डिग्री फिरणाऱ्या खुर्च्या, चार्जिंग पॉईंट दिलेत. स्वयंचलित दरवाजे, अपग्रेडेड लगेज रॅक प्रवाशांना आरामदायी प्रवासाचा अनुभव देतील. तसेच झिरो डिस्चार्ज टॉयलेट पर्यावरणाला सुरक्षित ठेवण्यात मदत करतील. ही ट्रेन फक्त वेगवान नाही तर त्यात विमान प्रवासासारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत.

**काश्मीर रेल्वे नेटवर्कचं स्वप्न पूर्ण**

वंदे भारत ट्रेन जम्मू श्रीनगर रेल्वे लिंक प्रकल्पाचा महत्त्वाचा भाग आहे. हा प्रकल्प जम्मू काश्मीरातील लोकांसाठी नवं पर्व सुरू करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते फेब्रुवारी महिन्यात त्याचे उद्घाटन होईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानं जम्मू काश्मीरचे लोक देशातील अन्य भागात सहजपणे पोहचवू शकतो. या रेल्वे नेटवर्कमुळे काश्मीरच्या विकासाला नवी गती मिळणार आहे.

## महाराष्ट्रातील ४ पोलीस अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक; ३१ जवान ठरले सेवा पदकाचे मानकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

महाराष्ट्र पोलीस सेवा दलात अतुलनीय कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले आहेत. केंद्र सरकारने प्रजाकसत्ताक दिनाच्या आधीच काही पदकांची घोषणा केली आहे. यात पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. केंद्र सरकारकडून कोणाकोणाला पुरस्कार जाहीर करण्यात आलाय.

महाराष्ट्रातील ४ पोलीस अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक, तर ३९ जवानांना गुणवत्तापूर्व सेवा पदके जाहीर झाली आहेत.

**विशिष्ट सेवा पदकाचे मानकरी**


१. डॉ. रविंदर कुमार झिले सिंग सिंगल, अतिरिक्त महासंचालक, महाराष्ट्र २. दत्तात्रय राजाराम कराळे, महानिरीक्षक, महाराष्ट्र ३. सुनील बळीरामजी फुलारी, महानिरीक्षक, महाराष्ट्र ४. रामचंद्र बाबू केंडे, कमांडंट, महाराष्ट्र

**गुणवत्तापूर्ण सेवा पदकाचे महाराष्ट्रातील मानकरी**

१. संजय भास्कर दराडे, महानिरीक्षक, महाराष्ट्र २. वीरेंद्र मिश्रा, महानिरीक्षक, महाराष्ट्र ३. S.M.T. आरती प्रकाश सिंह, महानिरीक्षक, महाराष्ट्र ४. चंद्र किशोर रामजीलाल मिना, महानिरीक्षक, महाराष्ट्र ५. दीपक कृष्णाजी साकोरे, उपमहानिरीक्षक, महाराष्ट्र ६. राजेश रामचंद्र बनसोडे, पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र ७. सुनील जयसिंग तांबे, पोलीस उपअधीक्षक, महाराष्ट्र ८. S.M.T. ममता लॉरेन्स डिसूझा, सहाय्यक पोलीस आयुक्त, महाराष्ट्र ९. धर्मपाल मोहन बनसोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, महाराष्ट्र १०. मधुकर माणिकराव सावंत, निरीक्षक, महाराष्ट्र

## शरद पवार आजारी, बोलताना होतोय त्रास पुढील चार दिवसांचे कार्यक्रम अचानक रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५पुणे**




राष्ट्रवादीचे शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची तब्येत बरी नसल्याने त्यांनी पुढील चार दिवसांचे सर्व कार्यक्रम रद्द केले आहेत. याबाबतची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने दिली आहे.

शरद पवार यांना कफ झाल्याने बोलताना त्रास होत आहे. यामुळे त्यांना कार्यक्रमांमध्ये भाषण करण्यास त्रास होत आहे. या कारणाने त्यांचे पुढील चार दिवसांचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले असल्याचे, पक्षाकडून कळविण्यात आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून पवार हे सांगली, कोल्हापूरच्या दौऱ्यावर होते. तेथील कार्यक्रम, सभांमध्ये पवारांना बोलण्यास त्रास होत होता. यामुळे पवारांना डॉक्टरांनी आरामाचा सल्ला दिल्याचे समजते आहे.

## नागपूर ठरले देशात सर्वाधिक वेगाने विकसित होणारे शहर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नागपूर**

'ऑरेंज सिटी' म्हणून ओळखले जाणारे नागपूर हे महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे शहर ठरले आहे. मिहान, समृद्धी महामार्ग आणि नागपूर मेट्रो सारखे महत्त्वाचे प्रकल्प कनेक्टिव्हिटी आणि आर्थिक वाढीसाठी महत्त्वाचे ठरले आहेत. हे शहर निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक गुंतवणुकीसाठी एक महत्त्वाचे केंद्र बनत आहे, जे संपूर्ण भारतातील लक्ष वेधून घेत असल्याचे कोलियर्स इंडियाच्या अहवालात समोर आले आहे. जयपूर आणि लखनौ ही शहरे नागपूरनंतर सर्वात वेगाने वाढणारी शहरे ठरली आहेत.रिअल इस्टेट सल्लागार संस्था कोलियर्स इंडियाने उभरत्या शहरांच्या विकासाची मूल्ये जाणून घेण्यासाठी एका व्यापक मापदंड-आधारित विश्लेषण केले. हे विश्लेषण भौतिक पायाभूत सुविधा, सामाजिक पायाभूत सुविधा, लोकसंख्याशास्त्रीय वाढ आणि आर्थिक विकास तसेच रिअल इस्टेट क्षेत्रातील वाढ यावर आधारित होते. हा विकास आर्थिक वाढीला गती देतो, टाउनशिप व पायाभूत सुविधांमुळे पर्यटनाला चालना मिळते. यामुळे घरांची मागणी वाढते, असे अहवालात म्हटले आहे.



**ही ठिकाणे ठरणार गेमचेंजर**

हिंगणा एमआयडीसीच्या जवळ असल्याने निवासी क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे. समृद्धी सर्कल संपूर्ण भारतातील विकासकांकडून येथे विकासक येत असून, एक लक्झरी निवासी सूक्ष्म बाजारपेठ म्हणून उदयास येत आहे. वर्धा रोड / बेसा उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी आणि जमिनीच्या उपलब्धतेमुळे निवासी मालमत्तांसाठी मोठी मागणी अनुभवत आहे. शिवमडका नागपूरच्या प्रमुख भागांशी कनेक्टिव्हिटी असून, नवीन निवासी प्रकल्पामुळे विकासाला चालना मिळत आहे.

## मनोज जरांगेंनी भाजपला सत्तेत बसवलं, मराठा आरक्षणासाठी स्वत:च दोषी; प्रकाश आंबेडकरांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसलं आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे आज पुन्हा उपोषणाला बसले आहेत. मनोज जरांगे पाटील हे अंतरावालीत सातव्यांदा उपोषण करत आहेत. यावेळी सरकारवर टीका करताना राज्यातील मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात यावे, तसा जीआर काढावा, अशा मागण्या मनोज जरांगे पाटील यांनी केल्या आहेत. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावर टीका केली आहे. मनोज जरांगेंनीच भाजपला सत्तेत नेऊन बसवलं असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.



मराठा समाजाला ओबीसीतून कुणबी प्रमाणपत्र, सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी यासह इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी पुन्हा बेमुदत उपोषण सुरू केले आहे. सरकार मराठा समाजाच्या मागण्या मान्य करेल, असा विश्वास जरांगे पाटील यांनी व्यक्त केला आहे. दुसरीकडे, प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केली आहे. मराठा आरक्षणासाठी स्वतः मनोज जरांगे पाटील हेच दोषी असल्याचा आरोप केला आहे.

मनोज जरांगे पाटील पुन्हा उपोषणाला बसलेत. त्यांचे हे उपोषण जरांगे पाटील विरुद्ध सुरेश धस असे गृहित धरायचे का? की दुसरे काही म्हणायचे? शेतकरी कर्जमाफीला जसे शेतकरी दोषी आहेत, तसेच मराठा आरक्षणासाठी स्वतः जरांगे दोषी आहेत. जे तुम्हाला मान्य करायला तयार नव्हते, त्यांनाच तुम्ही सत्तेत नेऊन बसवले, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट केले, पण भाजपला टार्गेट केले नाही. त्यामुळे त्यांनीच भाजपला सत्तेत नेऊन बसवले. विशेष म्हणजे हीच भाजप त्यांना सर्टिफिकेट देण्यास तयार नव्हती, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.

### शेतकरी सर्वात मूर्ख आहेत, त्यांनी आधी मतदान केले, ते आता का रडत आहेत - प्रकाश आंबेडकर

अमरावतीमध्ये शेतकरी कर्जमाफीवरून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सरकार आणि शेतकऱ्यांवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ते म्हणाले, कर्जमाफीचे आश्वासन देऊन आणि कर्जमाफीची सुद्धा आश्वासन सध्याच्या सरकारने शेतकऱ्यांकडून मते घेतली. शेतकरी मूर्ख आहेत कारण त्यांनी भाजपला सत्तेत आणले. आता तुम्ही का रडत आहात? तुम्ही शेतात जे काही पेराल तेच उगवेल. दुसरे काहीही नाही. होईल. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, मी शेतकऱ्यांना मूर्ख म्हटले आहे, म्हणून लोक मला शिव्या देतील, पण मला त्याची पर्वा नाही. शेतकऱ्यांनी चुकीचे सरकार निवडले आहे आणि आता ते त्याचे परिणाम भोगत आहेत.

## सरकार जनतेला लुटायला निघाली आहे - नाना पटोले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी एसटी आणि वीज दरवाढीवरुन महायुती सरकारवर निशाणा साधला. 'सरकारने एसटी आणि वीज दरवाढ केली आहे, याचा आम्ही निषेध करतो. आमचं सरकार आल्यावर आम्ही महागाई कमी करू असं त्यांनी आश्वासन दिले. मात्र सरकार जनतेला लुटायला निघाली आहे. या महागाई बद्दल सरकारने पुनर्विचार करावा आणि तातडीने राज्यातील एसटी व इलेक्ट्रिक भाडेवाढ केली आहे ती कमी करावे आणि राज्यात वाढलेली महागाई कमी करावी ही काँग्रेस पक्षाची मागणी आहे' असे वक्तव्य नाना पटोले यांनी केले आहे.






## 'ज्या ज्या वेळी फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार येते त्या त्या वेळी ते पुरून उरतात ...' चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५मुंबई**

राज्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटना आणि कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून विरोधक मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य करताना दिसत आहे. विरोधकांकडून होत असलेल्या टीकेनंतर आज महसूल मंत्री आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे चांगलेच भडकले. विरोधकांचा हा डाव असल्याचे सांगत त्यांनी प्रत्युत्तर दिले.

सत्ता न मिळाल्याने विरोधक अस्वस्थ आहेत. त्यांचा मानसिक पराभव झाला आहे. त्यामुळेच विरोधक सैफ अली खान यांच्यावरील हल्ला प्रकरणाचे तसेच बीड आणि परभणी येथील घटनांचे राजकारण करत आहेत. वास्तविक, अशा घटनांचे कोणीही अजिबात राजकारण करू नये. संजय राऊत आणि विजय वडेट्टीवार यांनी आमच्या महायुतीकडे जास्त लक्ष देण्यापेक्षा आपली महाविकास आघाडी कशी टिकेल, याकडे अधिक लक्ष देण्याची गरज', अशा शब्दात बावनकुळेंनी विरोधकांवर हल्ला चढवला.




ज्या ज्या वेळी राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार येते, त्या त्या वेळी काही घटकांकडून महाराष्ट्र अशांत केला जातो. पण, विरोधकांचा हा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. आमचे सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे याला पुरून उरतील, असे ते विरोधकांकडून होत असलेल्या आरोपांना उत्तर देताना म्हणाले.

**'पालकमंत्री पदावरून वाद नाहीत'**

पालकमंत्र्यांची यादी जाहीर झाली. त्यातील दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली. या मुद्द्यावर ते म्हणाले की, महायुती सरकारमध्ये पालकमंत्रिपदावरून कोणतेही वाद नाहीत, काही कुरबुरी असतील त्यावर चर्चेतून मार्ग निघेल. सातारा, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ येथे आमचे मंत्री असतानासुद्धा शिवसेनेला पालकमंत्रिपद देण्यात आले आहे.

## संपादकीय ......

# अफवांचा बाजार

कोणत्याही घटनेची किंवा बातमीची शहानिशा न करता अफवा पसरवून देणे आपल्याकडे आता अत्यंत घातक अशा पातळीवर येऊन पोहोचले आहे. आपले संन्यस्त जीवन शांतपणे व्यतित करणार्या पालघरमधील साधूंना कोणीतरी मुले पळवून नेणारी टोळी असल्याची अफवा पसरवून दिली आणि त्या निष्पाप, निरागस जीवांना जमावाच्या मारहाणीत बळी जावे लागले. काय घडले आहे किंवा घडत आहे हे पाहण्याची प्रवृत्ती आपल्या समाजात वेळोवेळी दिसून येते.

तुम्ही रस्त्याने गाडी चालवत असता आणि रहदारीमध्ये कुणा मोटारसायकलचा कुणा स्कुटीला धक्का लागलेला असतो. तिथे काही बाचाबाची पण होत असते. अशावेळी आपण रहदारीतून आपले वाहन पुढे काढताना डाव्या बाजूला वळून दिसेनासे होईपर्यंत ती घटना पाहत राहतो. अर्धवट लक्ष असल्यामुळे इथे आपलाही अपघात होण्याची शक्यता असते. दुर्दैवाने ते कोणीच लक्षात घेत नाही. जळगाव जवळ नुकताच घडलेला रेल्वे अपघात हा अपघात नसून हाराकिरी आहे, असे आमचे म्हणणे आहे. रेल्वे रुळावरून जात असताना चाकाचे आणि रुळाचे घर्षण होताना, ठिणग्या उडणे ही नित्याची बाब आहे. डब्याच्या पायरीवर बसून प्रवास करणार्या काही लोकांनी अशा ठिणग्या उडत असल्याचे पाहिले आणि रेल्वेला आग लागली असल्याची ओरड केली. तत्काळ काही लोकांनी साखळी ओढून गाडी थांबवली. गाडी थांबल्याचे पाहताच किमान शंभर एक लोक नेमके काय झाले आहे याची पाहणी करण्यासाठी डब्या खाली आले आणि बाजूच्या रेल्वे ट्रॅकवर उभे राहिले. हेच त्यांचे वर्तन अत्यंत घातक ठरले. विरुद्ध दिशेने येणारी दुसरी रेल्वे भरधाव वेगाने बाजूच्या ट्रॅकवर आली आणि त्या ट्रॅकवर उभे असणार्या लोकांना चिरडून पुढे गेली. काय झाले असेल ते असो परंतु डब्यामध्ये शांतपणे बसून असलेले लोक वाचले आणि आगाऊ कुतूहल असलेले लोक यामध्ये मरण पावले किंवा जखमी झाले.

विरुद्ध दिशेने आणि बाजूच्या रुळांवर येणारी रेल्वे वेगात होती आणि ती आपल्या मार्गाने व्यवस्थित निघून गेली. घडलेल्या घटनेत रेल्वे प्रशासनाची काहीही चूक नाही. प्रत्यक्ष जाऊन काय घडले आहे हे पाहण्याचा आगाऊपणा काही लोकांनी केला आणि तोच त्यांच्या जीवावर बेतला असे दिसून येते. किती काळ आपण असे जीव गमावणार आहोत हे समजण्यास मार्ग नाही. काहीही घडले असेल तर फार झाले तर खिडकीतून किंवा दरवाजातून वाकूनही पाहता आले असते. पाच-दहा लोक उतरल्याबरोबर अति चिकित्सक असे आणखी शंभर लोक उतरले आणि मृत्यूला सामोरे गेले. अवघ्या काही क्षणात अनेक प्रवाशांचे प्राण गेलेले होते आणि त्यांची प्रेते भयाण अवस्थेत बाजूच्या ट्रॅकवर पडलेली होती हे दृश्य अंगावर काटा आणणारे होते. कुणीतरी रेल्वेला आग लागली म्हणून ओरडले. काही लोकांनी साखळी ओढून रेल्वे थांबवली आणि उड्या मारण्यास सुरुवात केली. या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की एकाच डब्यातील लोकांनी उड्या मारलेल्या आहेत कारण याच डब्यातील काही लोकांनी आग लागल्याची अफवा सोडून दिली होती. एका मेंढराने उडी टाकली म्हणून कळपातील इतर मेंढ्या पण उडी टाकतात त्यापेक्षाही भयावह अशी परिस्थिती माणसांची होऊन बसली आहे.

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

## कविता ही मानवी मनाचा सर्जनशील आविष्कार - डॉ. मोना चिमोटे

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५अमरावती-** माणसाचे मन हे संवेदनशील असते.ते विविध विषयांचा आस्वाद घेते. आस्वादणारे मन चिंतनशीलतेच्या प्रक्रियेला बळ पुरविते व या सर्जनप्रक्रियेमधून कवितेचा जन्म होतो. कविता ही कवीचा जसा आत्मशोध असतो तसा तो समाजमनाचाही शोध असतो. कवितेत अस्सल अनुभवांबरोबरच भाषेचे सौंदर्यही महत्त्वाचे असते. कविता ही खर्‍या अर्थाने मानवी मनाचा सर्जनशीलआविष्कार आहे, असे प्रतिपादन डॉ. मोना चिमोटे यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा - २०२५



अंतर्गत 'मराठी कविता : परंपरा आणि वर्तमान' या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. आपल्या भाषणातमराठी कवितेचे प्राचीन, अर्वाचीन, साठोत्तरी व समकालीन या वेगवेगळ्या टप्प्यांवर बदलेले स्वरूप, आशय याविषयी त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण भाष्य केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावतीच्या मराठी विभागप्रमुख डॉ. वर्षा चिखले यांना निमंत्रित करण्यात आले होते.

या कार्यक्रमात पदव्युत्तर मराठी विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी काही निवडक कविताचे अभिवाचन केले. त्यात संत ज्ञानेश्वर, रघुनाथ पंडित, अनंत फंदी, सावित्रीबाई फुले, केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, बहिणाबाई चौधरी, कुसुमाग्रज, ना.धों. महानोर, यशवंत मनोहर, दया पवार, सुरेश भट, अरुण कोल्हटकर,मल्लिका अमर शेख यांच्या कवितांचे अभिवाचन अनुक्रमे अमृता राऊत, उज्ज्वला गुल्हाने, सारिका वनवे, पूजा अडोळे, डॉ.प्रणव कोलते, गणेश पोकळे, ऋषिकेश पाडर, अभिजित इंगळे, हेमंत सावळे, साक्षी धुळे आणि डॉ मोना चिमोटे यांनी केले.याप्रसंगी शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल डॉ.वर्षा चिखले यांचा विभागाच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. चिखले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कवितांचे मानवी जीवनातील स्थान यावर भाष्य करून वाचन संस्कृती ही माणसाला जगायला शिकवते, चांगले साहित्य संस्कार घडवतात तसेच पुस्तकांशी मैत्री झाली तर वैचारिक बैठक तयार व्हायला मदत होते, असे सांगितले.

विदर्भ साहित्य संघाच्या शाखा अमरावतीच्या कार्यकारिणी सदस्य व भारतीय महाविद्यालय अमरावतीच्या मराठी विभागप्रमुख डॉ. मीता कांबळे यांनी पंधरवड्यादरम्यान राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अभिजित इंगळे यांनी केले.

## उमेश रमेश नाईक यांनी शासकीय मुलांचे अनुरक्षण गृह येथे प्रत्यक्ष हजर राहण्याबाबत सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती.-** महिला व बालविकास विभाग अंतर्गत येत असलेल्या शासकीय मुलांचे अनुरक्षण गृह, अमरावती या संस्थेत स्वयंपाकी पदावर कार्यरत असलेले उमेश रमेश नाईक रा. प्लॉट नंबर १५ बी. भीमाशंकर लेआउट श्री. निवास अपार्टमेंटच्या समोर, मंगलधाम कॉलनी रोड अमरावती. दि. ५ ऑक्टोंबर २०२१ पासून अनुपस्थितीत आहेत. श्री. नाईक यांच्या नमूद पत्त्यावर कार्यालयातील कर्मचारी पाठवून सुद्धा ते तेथे राहत नसल्याचे त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. पोलीस विभागाद्वारे प्राप्त झालेले समज पत्र बजावून घेण्यासाठी उमेश रमेश नाईक यांनी हजर होऊन प्रत्यक्ष कार्यालयात तात्काळ संपर्क साधावा, असे शासकीय मुलांचे अनुरक्षण गृहाचे अधीक्षक पी. व्ही. नन्नावरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# माती विना शेतीचा आधुनिक आविष्कार 'हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान'

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

अलीकडे वाढते शहरीकरण व औद्योगिकरणामुळे शेतीचे क्षेत्र कमी होत आहे. अशा परिस्थितीत पिकाचे कमीत कमी क्षेत्रात जास्तीत जास्त उत्पन्न मिळवणे गरजेचे आहे. मातीचा उपयोग न करता झाडांना आवश्यक असलेले पोषक द्रव्य पाण्याच्या साह्याने दिली जातात यालाच हायड्रोपोनिक्स असे म्हणतात.

हायड्रोपोनिक्स शेती म्हणजे अशी शेती जिला मातीची गरज नसते वनस्पतीला व पिकाला आवश्यक खनिजे आणि खते पाण्याद्वारे दिली जातात. हायड्रोफोन शेतीत पीक उत्पादनासाठी फक्त तीन गोष्टी आवश्यक असतात पाणी, पोषक आणि प्रकाश जर आपण मातीशिवाय या तीन गोष्टी दिल्या तर झाडे फुलू शकतात, अशा तंत्रनास हायड्रोपोनिक्स तंत्र असे म्हणतात.

हायड्रोपोनिक्स तंत्राद्वारे घेतली जाणारी पिके यामध्ये जागेचा कमीत कमी वापर करणाऱ्या पिकांची लागवड केली जाते. जसे की गाजर, मुळा, शिमला मिरची, स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी, अननस, टोमॅटो, भेंडी, पालक, काकडी, औषधी वनस्पती चांगल्या प्रकारे वाढवता येतात.

**हायड्रोपोनिक्स चे प्रकार** - क्टिव प्रकार : यामध्ये पाण्याच्या साह्याने पीक घेतले जाते. पाण्याचा वापर पुन्हा पुन्हा केला जातो. क्टिव्ह पद्धतीमध्ये जास्त काळजी घ्यावी लागत नाही पाण्याच्या एकसमान वितरित करण्यासाठी पंपाचा




वापर केला जातो. या प्रणालीमुळे जलद वाह आणि उच्च उत्पन्नाचा फायदा मिळतो.

**पॅसिव्ह प्रकार** : या पद्धतीत हायड्रोफोनिक व कोकोपीट चा वापर करून पिके घेतली जातात. कोकोपीट हे नारळाच्या केसरा पासून बनवतात दोन्ही पद्धतीमध्ये झाडाला आवश्यक घटक पुरवले जातात.

**हायड्रोपोनिक्स शेतीची सुरुवात कशी करावी-** पहिले हायड्रोपोनिक्स फार्म तयार करा. हायड्रोपोनिक्स शेतीसाठी सेटअप जरी महाग असेल तरी हे जास्त जागा घेत नाही. पीव्हीसी पाईप आणि पाण्याच्या पंपाच्या मदतीने तुम्ही हायड्रोपोनिक्स फार्म तयार करू शकता. हे स्ट्रक्चर तुम्ही घरच्या घरी ही बनवू शकतात किंवा मार्केट मधूनही खरेदी करू शकतात. तुम्ही गोल पाईप किंवा सपाट आकाराचे पाईप देखील वापरू शकतात. पाइपची कनेक्शन योग्यरित्या करणे आवश्यक आहे कारण या पाईप मध्ये सतत पाणी वाहते या पाईप मध्ये गोलाकार छिद्रे असतात त्यामध्ये झाडे उगवली जातात. पाईप भरण्यासाठी साहित्य गोळा करा साहित्य म्हणजे आपण नारळाचा भुसा वापरू शकता, जेणेकरून पाईप मध्ये ओलावा टिकून राहील

**वनस्पतीना लागणारे पोषक तत्वे-** हायड्रोपोनिक्स शेतीमध्ये सर्वात महत्त्वाचा हा भाग आपल्याला कोणते पीक घ्यायची आहे यानुसार पोषक द्रव्य निर्भर आहे. जेव्हा पीक मातीमध्ये वाढते तेव्हा त्याला सर्व पोषक तत्वे ही जमिनीतून मिळतात. हायड्रोपोनिक्स शेतीमध्ये पाईप द्वारे झाडांना पाणी दिले जाते या पाण्यात ते पोषक घटक मिसळले असतात.

**हायड्रोपोनिक्ससाठी पाण्याची व्यवस्था-** हायड्रोपोनिक्स शेती ही पाण्यावर अवलंबून असते तरीही काम अगदी कमी पाण्यात पूर्ण होते. हायड्रोपोनिक पद्धतीने पाणी देण्याचा नियम असा आहे की झाडाचे मूळ नेहमी ओले असले पाहिजे. इथे पाण्यामध्ये लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे पाण्याची पीएच व्हॅल्यू संकुलित ठेवावी लागते. पीएच मेंटेन ठेवण्यासाठी त्यात वेगवेगळी रसायने मिसळली जातात.दुसरी गोष्ट अशी की पाण्यात ऑक्सिजनचे प्रमाण पुरेशी असावे. वनस्पतीची मुळे कधी कधी जमिनीवर खोदली जातात त्यामुळे त्यांना ऑक्सिजन मिळू शकतो परंतु हायड्रोपोनिक्स मध्ये झाडांची मुळे ही पाण्यामध्येच असतात.

**हायड्रोपोनिक्स शेतीचे फायदे**

कमी जागेत जास्त उत्पादन करू शकतो. ९० टक्के पाण्याची बचत होते. जागेचा सर्वाधिक वापर करता येतो. वर्षभर उत्पादन घेता येते. कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. मशागत, आंतरमशागत, खुरपणी अशी कामे करावी लागत नाही. मातीमधून ज्या रोगांचा प्रादुर्भाव होतो तो टळतो. ट्रान्सपोर्टेशन चा खर्च होत नाही.

**प्रा. अभिषेक पी. धुमाळ**

आदित्य कॉलेज ऑफ अ‍ॅग्री, बायोटेक्नॉलॉजी, बीड.




## आतड्यांचे आरोग्य बिघडवणारे घटक कोणते? जाणून घ्या

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**


आतडे हा आपल्या पचनसंस्थेचा प्रमुख भाग आहे. सेवन केलेल्या आहाराचे पचन आणि अवशोषण हे आतड्यांमध्येच होत असते. त्यामुळे तंदुरूस्तीसाठी आतड्यांच्या समस्या आणि त्यांची ओळख करून घेणे अधिक गरजेचे आहे.

पौष्टिक आहार सेवन करावा हे खरे असले तरीही आरोग्य हे केवळ आपण किती पौष्टिक आहाराचे सेवन करतो त्यावर अवलंबून नाही तर शरीर तो आहार किती पचवू शकतो आणि त्यातील पोषक घटक किती प्रमाणात शोषून घेऊ शकतो यावर तंदुरुस्ती अवलंबून असते. आहार सेवन केल्यानंतर त्याचे पचन आणि शोषण करण्याचे कार्य लहान आतडे आणि मोठे आतडे यांच्यामध्ये होत असते. याच ठिकाणी पोषक घटकांचे शोषण होते. मोठ्या आतड्यामध्ये पाण्याचे शोषण होते आणि लहान आतड्यामध्ये खनिजे, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक घटकांचे शोषण होते. आतडे आजारी पडल्यास आहार पचनावर प्रभाव पडतो असे नाही तर पोषक घटकांच्या शोषणावरही प्रभाव पडतो.

पचन संस्थेमध्ये चांगले जीवाणू मोठ्या आतड्यामध्ये आणि लहान आतड्याच्या मागील भागात असतात. अन्ननलिका, पोट आणि लहान आतडे याच्या पृष्ठभागी पाचक रस आणि एन्झाईम्स असल्यामुळे तिथे जीवाणू नसतात. उपयुक्त जीवाणू जगण्यासाठी आवश्यक असतात. ते एन्झाईम्स उत्पन्न करतात जे भोजन पचवण्यास मदत करतात. शरीरासाठी आवश्यक 'बी' जीवनसत्त्व आणि के जीवनसत्त्व यांची निर्मिती केली जाते ते हानीकारक जीवाणूंसमवेत लढतात. संसर्गापासून बचाव करतात आणि आतड्याच्या अंतत्वचेचे संरक्षण करतात. अतिताण, झोप पूर्ण न होणे, चरबी आणि शर्करेचे जास्त सेवन आणि जास्त प्रमाणात प्रतिजैविके यांचे सेवन केल्याने आतड्यांमधील चांगल्या जीवाणूंच्या संतुलनावर परिणाम होतो.

आतड्यांचे आरोग्य बिघडवणारे घटक

शरीराच्या गरजेपेक्षा अधिक आहार घेणे, रात्री जास्त आणि पचनाला जड आहार घेणे. सकाळी न्याहारी न करणे तसेच दोन जेवणांत खूप मोठे अंतर ठेवणे. जेवल्यानंतर खूप पातळ पदार्थांचे सेवन करणे. जास्त तळलेले, तेलकट आणि मसालेदार आहार करणे. शारीरिक सक्रियता कमी होणे. तणाव आणि अनिद्रा यामुळेही आतड्यांचे आरोग्य



बिघडते. त्याशिवाय पचन तंत्र बिघडणे, अतिवजन किंवा खूप कमी वजन असणे, झोप न लागणे, सतत थकवा जाणवणे, त्वचेशी निगडीत समस्या निर्माण होणे, ऑटो इम्युन डिसॉर्डर म्हणजे शरीरच स्वतः चांगल्या पेशींचे नुकसान करते. काही विशेष पदार्थ पचण्यात त्रास होणे. आतड्यांच्या सामान्य कार्यात बाधा आल्यास त्याचा परिणाम हृदय, मेंदू, प्रतिकारक्षमता, त्वचा, वजन आणि शरीरातील हार्मोन्सच्या पातळीवरही पडू शकते. त्यामुळे आहारातील पोषक घटकांचे शोषणावरही परिणाम होऊ शकतो आणि त्यामुळे कर्करोगाचा विकास होऊ शकतो. आतडे खराब झाल्यामुळे आरोग्याच्या समस्या वाढण्याचा धोका असतो.

आतड्यांचे आरोग्य असे राखा

अति तळलेले, तेलकट मसालेदार पदार्थ सेवन करणे टाळावे. तणावाचा पचन संस्थेवर खूप जास्त परिणाम होतो त्यामुळे तणाव टाळण्याचा प्रयत्न करावा. शारीरिक सक्रियता असावी आणि नियमितपणे व्यायाम आणि योग करावा. आहार सेवन करताना हळूहळू चावून जेवावे. दिवसभरात काही तासांनी थोडा थोडा आहार सेवन करावा. जेवल्यानंतर लगेच झोपू नये. थोडा वेळ फिरावे.

# देशातील नामांकित संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

**अर्ज सादर करण्यास दि. १४ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती**

देशातील AIIMS, IIM, IIIT, NIT, IISc IISER, Institution of National Importance Other Colleges या शैक्षणिक संस्थांसह भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय संकेत स्थळा वरील मान्यता प्राप्त नामांकित संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यां साठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना राज्याच्या समाज कल्याण विभागाकडून राबविली जाते. या योजने अंतर्गत सन २०२४-२५ वर्षाकरिता दि. १४ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आवेदन अर्ज मागविण्यात आले आहे, असे समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त सुनील वारे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या/नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. राज्यातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याच्या उद्देशाने विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ निहाय १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. सदर योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठ/संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, नोंदणी फी,




जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादी शुल्क संबंधित विद्यापिठ/शैक्षणिक संस्थे मार्फत विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते. वसतीगृह व भोजन शुल्क यांचा देखील संस्था आकारणीनुसार खर्च देण्यात येणार आहे. या योजनेविषयी आधिक माहिती, जाहिरात, आवेदन अर्ज व नियमावली शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ताज्या घडामोडी या मथळ्याखाली प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर संकेतस्थळावरुन विहित अर्जाचा नमूना डाऊनलोड करुन तो परिपुर्ण भरुन कागदपत्रासह दि १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च पथ पुणे. येथे सादर करावे. महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांना योजनेंतर्गत लाभ देय राहील. सदर योजनेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रादेशिक उपायुक्त श्री. वारे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


# रहाटगाव भागातील १०० पैकी ३५ जणांची कागदपत्रे संशयास्पद

## क्राईम ब्रांच युनिट २ कडे चौकशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती** भाजपा नेते किरिट सौमय्या यांनी अंजनगावसुर्जी तालुक्यात व अकोला जिल्ह्यात बांग्लोदशी घुसखोर शिरले असल्याचा गौप्यस्फोट केल्याने सीपीरेड्डी यांनी शहरात बांग्लोदशी घुसखोरांच्या हालचाली आहेत का, हे तपासण्यासाठी २३ जानेवारी रोजी विविध पथके गठीत केली आहे. गुन्हेशाखा व सीपी स्पेशल स्कॉडने रहाटगावच्या अंबा बिझनेस पार्कसह शहरातील विविध साईटवर असलेल्या सुमारे १०० परप्रांतीयांच्या कागदपत्रांची कसून तपासणी केली असता त्यापैकी ३५ जणांचे कागदपत्रे संशयीत असल्याचे आज २४ जानेवारी रोजी स्पष्ट झाल्याने सीपी रेड्डी यांनी याबाबतची चौकशी गुन्हेशाखा युनिट २ कडे



दिली आहे.ङकिरिट सौमय्या यांनी बांग्लादेशी घुसखोरांचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर सीपी नविनचंद्र रेड्डींच्या आदेशने गुन्हेशाखेचे बाबाराव अवचार व सीपी स्पेशल स्कॉडचे प्रमुख एपीआय महेन्द्र इंगाले यांच्या पथकांनी २३ जानेवारीला सकाळी ११ वाजताच्या सुमारास रहाटगाव भागातील अंबा बिझनेस पार्कवर धडक देऊन तेथे काम करित असलेल्या सर्व परप्रांतीय १०० मजूरांच्या रहिवासी दाखल्यासह इतर कागदपत्रांची तपासणी सुरू केली होती. यासह स्थानिक पोलिसांनी सुध्दा आपआपल्या हद्दीत सुरू असलेल्या मोठे बांधकाम, व्यापारी संकुल, चौकातील कुल्फी, पाणीपुरी, भाजीपाला विकणाऱ्या परप्रांतीयांची सुध्दा कसून चौकशी केली. तसेच ज्याही विक्रेत्यांनी संबंधीत पोलिस ठाण्यात मुसाफिर डायरीमध्ये नोंद केली नसेल त्यांना ठाण्यात जाऊन आपली नोंद करून घेण्याची ताकीद दिली. दरम्यान आज गुन्हेशाखा युनिट २ ने अंबा बिझनेस पार्कमधील ज्या १०० परप्रांतीय मजूरांच्या कागदपत्रांची तपासणी केली त्यापैकी ३५ मजूरांची कागदपत्रे संशयीत असल्याचे आढळून आले. त्यामुळे सीपी रेड्डी यांनी याबाबत गुन्हेशाखा युनिट २ कडे चौकशी दिली आहे. शहरात एकही बांग्लोदशी नागरिक सापडला नाही. परंतु, आता बांग्लादेशी घुसखोरांना शोधण्यासाठी निरंतर मोहिम सुरू राहणार आहे. यासाठी स्थानिक लोकांनी आप आपल्या भागात असलेल्या परप्रांतीय मजूरांची माहिती पोलिसांना द्यावी, असे आव्हान सीपी रेड्डी यांनी शहरवासियांना केले आहे.

# गोवंश तस्करी करणाऱ्या वाहनाची गोरक्षकांकडून तोडफोड

## तीन गोवंशांचा मृत्यू, ११ गोवंश सुखरूप



### महामार्गावरील वाहतूक ठप्प

**वदर्भ प्रजासत्ताक**


**दि.२५नांदगाव पेठ** – राष्ट्रीय महामार्गावरून गोवंश तस्करी ही नित्याचीच बाब झाली आहे. दररोज शेकडो वाहनांमधून खुलेआम गोवंश तस्करी करण्यात येते शुक्रवारी सुद्धा एका वाहनातून अवैधरित्या गोवंश कोंबून कत्तलखान्यात जात असतांना परिसरातील गोरक्षकांनी त्या वाहनाला पकडले मात्र वाहनामध्ये तीन गोवंशांचा गुदमरून मृत्यू झाल्याने संताप अनावर झालेल्या गोरक्षकांनी त्या वाहनाची तोडफोड केली. ही घटना सकाळी ११ वाजताच्या दरम्यान रहाटगाव येथील पुलाजवळ घडली. घटनेने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते तर महामार्गावरील वाहतूक सुद्धा काही वेळ ठप्प झाली होती. नांदगाव पेठ मार्गावरून अमरावती कडे पीक अप वाहन क्र. एम एच २९,बी ई ०५४१ मधून गोवंश कत्तलखान्यात जात असल्याची गुप्त माहिती परिसरातील गोरक्षकांना मिळताच त्यांनी सकाळपासून रहाटगाव येथील पुलाजवळ दबा धरून ठेवला. सकाळी ११ वाजताच्या दरम्यान सदर वाहन रहाटगाव जवळ येताच पाच ते सहा गोरक्षकांनी त्या वाहनाला अडविले.गोरक्षकांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १४ गोवंश आढळले.सर्व गोवंशाचे हातपाय आणि तोंड दोरीने बांधलेले होते मात्र यामध्ये तीन गोवंशांचा गुदमरून मृत्यू झाल्याने गोरक्षकांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी त्या वाहनाची तोडफोड सुरू केली. यामधील चालक याने गोरक्षकांचे रौद्ररूप बघून वाहनातून पळ काढला. दरम्यान घटनेची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता तातडीने मुख्यालयातील अतिरिक्त ताफा, क्यूआरटी, आरसीपी पथकांना घटनास्थळी पाचारण केले. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक जवळपास एक तास ठप्प झाली होती.पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न करून गोरक्षकांचा राग शांत केला आणि वाहतुक सुरळित करून परिस्थिती पूर्ववत केली. त्यानंतर पोलिसांनी सदर वाहन जप्त करून नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या आवारात लावले. अन्य वाहनाने ११ गोवशांना नांदगावपेठ येथील गोशाळेत दाखल करण्यात आले. याबाबत पोलीस उपनिरीक्षक प्रदीप शहाणे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध कलम ५(अ),५(ब),पशुसंरक्षण अधिनियम १९८६ सहकलम ११/१ (ड),प्राणी छळ अधिनियम १९६० सहकलम ३२५,बीएनएस ८३/१७७ मोटार वाहन कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस करत आहे.

# पुष्पप्रदर्शनीतील तजेल फुलांप्रमाणे डेझी शहा च्या उपस्थितीने अमरावतीकरांना रिझविले

## कले सोबतच आपल्या सभ्यता व संस्कृतीची जोपासना करणे हाच महोत्सवाचा उद्देश-आ.सौ. सुलभाताई खोडके

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती** – प्रविण खोडके मेमोरियल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठान द्वारा आयोजित अमरावती आमदार सांस्कृतिक महोत्सव २०२५ ला आज दिनांक २४ जानेवारी २०२५ पासून मोठ्या थाटात सुरुवात झाली. तीनदिवस चालणाऱ्या या महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी सिने अभिनेत्री डेझी शाह (जय हो फेम ) यांची विशेष उपस्थिती आकर्षणाचे केंद्र ठरली होती. ङयाप्रसंगी ट्रस्टच्या अध्यक्ष आ. सौ. सुलभाताई खोडके ,अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अमरावती गार्डन क्लब चे अध्यक्ष





डॉ.सि. एम. देशमुख देशमुख , डॉ. भोजराज चौधरी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. याप्रसंगी पुष्पप्रदर्शनीतील तजेला फुलांप्रमाणे मनमोहक असलेल्या सिने अभिनेत्री डेझी शहा यांनी सर्वांचे लक्ष वेधले होते. अमरावतीमध्ये येऊन खूप आनंद झाला असून, या उत्कृष्ट आयोजनातून फार काही शिकायला मिळाले, पुष्पप्रदर्शनीतुन सुद्धा पर्यावरण वाचावा चा संदेश मिळाला आहे. मान्यवरांच्या संबोधनातून चांगले विचार मिळाले असून, हेच आपण सोबत घेऊन जात असल्याचे सांगून सुप्रसिद्ध अभिनेत्री डेझी शाह यांनी उपस्थितांशी दिलखुलास संवाद साधला.ङयावेळी प्रवीण खोडके मेमेरीयल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठानच्या अध्यक्ष तथा अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी आपल्या संबोधनात कार्यक्रमाच्या आयोजना मागची भूमिका विशद केली. विदर्भाची सांस्कृतिक नगरी म्हणून अमरावतीचा नावलौकिक आहे. कला, क्रीडा ,साहित्य,सांस्कृतिक या वैभवाचे नेहमीच जतन करून नेहमीच अमरावतीकरांना विविध कला-क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांची बहारदार मेजवानी दिली आहे.अमरावती शहरातील स्थानिक कलावंतांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पुणे , मुंबई सारख्या महानगराच्या धर्तीवर अमरावतीमध्ये सुद्धा सांस्कृतिक महोत्सवाचे भव्य आयोजन होत असल्याने या महोत्सवातील सहभागी स्पर्धक आज देशपातळीवर तसेच चित्रपट सृष्टीत सुद्धा कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवत आहे.ङअमरावतीचे सांस्कृतिक क्षेत्र असेच प्रगल्भ होण्यासाठी आता आपल्याला हवाहवासा महोत्सव नव्या रंगात -व जोशात आपल्या भेटीला आला आहे. तीन दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची धूम राहणार असून कले सोबतच आपल्या सभ्यता व संस्कृतीची जोपासना करणे हाच महोत्सवाचा उद्देश असल्याचे आमदार महोदयांनी सांगितले. यावेळी पोलीस आयुक्त अमरावती शहर नवीनचंद्र रेड्डी व मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सुद्धा आपल्या संबोधनातून आयोजनाची प्रशंसा केली. अमरावतीचा सांस्कृतिक वारसा अधिक प्रगल्भ करणारा हा उत्सव असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अमरावती गार्डन क्लब द्वारा आयोजित भव्य पुष्प प्रदर्शनातील विजेत्या स्पर्धकांना मान्यवर अतिथींच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच राज्य व राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी व गुणवंतांना सुद्धा सन्मानित करण्यात आले. तत्पूर्वी सिने अभिनेत्री डेझी शाह, आ.सौ.सुलभाताई खोडके यांचेसह सर्व मान्यवर अतिथींनी पुष्पप्रदर्शनी व महिला बचत गट उत्पादित वस्तूंच्या प्रदर्शनाचे फीत कापून उदघाटन केले. तसेच प्रदर्शनातील पुष्प सजावट व आकर्षक कुंड्यांची पाहणी केली. महोत्सवाच्या उदघाटना नंतर लगेच स्वरशोध हिंदी-मराठी सिने गीतगायन स्पर्धेच्या पहिल्या फेरीला सुरुवात झाली. तीन दिवस चालणाऱ्या या सांस्कृतिक महोत्सवात विविध कार्यक्रम आयोजित केले आहे.

शनिवारी महिलांसाठी खास हळदी कुंकू व विविध कार्यक्रम होणार आहे, स्वर-शोध मध्ये दुसरी फेरी रंगणार आहे. विविध स्टॉलवर वस्तूंची विक्री तसेच खाद्य पदार्थांचे स्टॉल ही लावण्यात आले आहेत. रविवारी समूह नृत्य स्पर्धा व नंतर बक्षीस वितरणाने महोत्सवाचा समारोप होणार आहे. सर्व अमरावतीकरांनी या सर्व कार्यक्रमांचा आनंद लुटावा, असे आवाहन प्रविण खोडके मेमेरीयल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठानच्या अध्यक्ष आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी केले आहे.

# एसटी दरवाढीने मोडले सर्वसामान्यांचे कंबरडे

## माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांची राज्य शासनावर टिका

**विदर्भ प्रजासत्ताक**




**दि.२५अमरावती–** सोयाबीन व तुरीला भाव न देणाऱ्या आताच्या राज्य सरकारने एसटीची दरवाढ मात्र केली, एसटी दरवाढीने सर्वसामान्यांच्या पोटाला चिमटा बसला आहे, त्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे, अशा शब्दात माजी मंत्री, तथा काँग्रेसच्या नेत्या यशोमतीताई ठाकूर यांनी सरकार विरोधात आपला संताप व्यक्त केला, सर्वसामान्यांचे पोटावर कशी लाथ मारावी हे आताच्या सरकारकडून शिकले पाहिजे, राज्यात कुठल्याही नियोजनाशिवाय सुरू करण्यात आलेल्या योजनांचा भुर्दंड तिजोरीवर बसत असून नागरिकांच्याकडून वसूल केला जात आहे , असेही त्या म्हणाल्या, राज्य शासनाने एसटीची दरवाढ जाहीर केले असून त्या विरोधात राज्यातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे, चुकीच्या पद्धतीने नियोजन करून सुरू करण्यात आलेल्या योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर जो भुर्दंड निर्माण होत आहे तो आता सर्वसामान्यांच्या खिशातून वसूल केल्या जाणार आहे हेच एसटीच्या भाडेवाडीच्या निमित्ताने राज्य सरकारने स्पष्ट केले आहे..

# उद्या २६ जानेवारीला शहरातील तीन उड्डाण पूल राहणार बंद

## वाहतूक पोलिसांची अधिसूचना जारी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५ अमरावती** पोलिस आयुक्तालयातील वाहतुक पोलिस विभागाने उद्या २६ जानेवारी प्रजासत्ताकदिन निमित्य शहरातील तीन उड्डानपुल बंद ठेवण्याची अधिसुचना जारी केली आहे.२६ जानेवारीला पहाटे ६ ते रात्री १२ पर्यंत शहरातील तीन उड्डाणपुल बंध राहणार आहे.वाहतुक विभागाच्या प्रभारी सहाय्यक आयुक्तरिता उईके यांनी जारी केलेल्या अधिसुचनेनुसार २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी शहरातील शाळा, महाविद्यालय, खाजगी व शासकीय कार्यालयांमध्ये झेंडावदंन होत असल्याने पहाटेपासून शहरात शालेय विद्यार्थ्यांसह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वरदळ सुरू असते. तसेच राजकीय कार्यालयासह शहरातील विविधप्रमुख चौकांमध्ये



प्रजासत्ताकप्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे शहरात वाहतुक कोंडी निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून २६ जानेवारीला शहरातील पंचवटी, इर्विन ते राजापेठ, राजापेठ ते नंदामार्केट, बडनेरा तिहेरी पुल हे तिन्ही पुल पहाटे ६ रात्री १२ वाजेपर्यंत बंद राहणार असल्याची अधिसुचना वाहतुक पोलिसांनी जारी केली आहे.

# आंतरराष्ट्रीय वक्त्या राजयोगिनी उषा दीदी यांचे सोमवार २७ ला प्रवचन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय १५० देशांमध्ये कार्यरत असून भारतात ८ हजाराहून अधिक सेवा केंद्र कार्यरत आहेत. त्या माध्यमातून नैतिक व आध्यात्मिक मूल्य पूर्णस्थापन करण्याचे तसेच मानवाला सुख शांती संतुष्ट मिळावी, याकरिता कार्यरत आहे. सोमवारी (ता. २७ जानेवारी) वरिष्ठ राजयोग शिक्षिका तथा आंतरराष्ट्रीय वक्त्या राजयोगिनी उषा दिदी यांचे अमरावती शहरात आगमन होणार आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी सात वाजता प्राईम पार्क येथे खुशी का पासवर्ड या विषयावर त्या प्रवचन देणार आहेत. या प्रवचनाकरिता अमरावतीकरांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्व विद्यालय अमरावतीच्या जिल्हा संचालिका राजयोगिनी सीता दीदी यांनी स्थानिक राजापेठ येथील श्रमिक पत्रकार भवन येथे शुक्रवारी (ता.२४) रोजी पत्र परिषदेतून केले.खुशी का पासवर्ड या प्रवचनाकरिता खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा, कंवरधामचे संतराजेशलाल मोरडिया, जिल्हाधिकारी सौरभकटियार, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद सिंगुरी, एसआरपीएफचे आंतरराष्ट्रीय



वक्त्या राजयोगिनी उषा दीदी यांचे २७ ला प्रवचनकमांडर राकेश कलासागर, प्रसिद्ध समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया, प्रतिदिनचे संपादक नानक अहुजा, राजेंद्र जैन, उद्योजक दीपक भारतीया यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती राजयोगिनी सिता दीदी यांनी दिली. ब्रह्माकुमारीज् अमरावतीद्वारा हनुमान गढी परिसरात तपस्या धाम रिट्रीट सेंटर होणार असून त्याचे भूमिपूजन सोमवारी २७ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता राजयोगिनी उषा दिदी यांच्या हस्ते होणार आहे.त्यानंतर ब्रह्माकुमारीज् परिवारातील सदस्यांकरिता दुपारी ३.३० ते ६ वाजेपर्यंत विशेष प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. 'ब्राह्मण जीवनामध्ये सफलता व त्याचा आधार' या विषयावर त्या प्रवचन देणार आहेत. मंगळवारी (ता. २८) मोर्शी सेवा केंद्राकडे प्रस्थान करतील. सकाळी ८ वाजता प्रभू उपहार भवन, त्रिमूर्ती नगर मोर्शी येथे उषा दिदी यांचे भव्य स्वागत होईल.

यावेळी त्या सेवा केंद्राचे उद्घाटन करणार आहेत. त्यानंतर सकाळी ११ वाजता मोर्शी येथील नागरिकांकरिता स्थानिक शिरभाते मंगल कार्यालय, अमरावती रोड येथे 'जीवन मे दुवाओ का महत्व' या विषयावर त्या प्रवचन देणार असल्याचे समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लपी भैय्या जाजोदिया यांनी सांगितले.पत्र परिषदेला दिलीप कोटक, हरीश आडवाणी, दीपक घाटे, डॉ. विशाल तापडिया, डॉ. स्वप्नील सोनवणे, बिके राजेश, तुलसी भाई, बिके अश्विनी दीदी, जया धाके, बीके प्रमोद उपस्थित होते.

# वीज ग्राहकांसाठी आनंदाची बातमी:पहिल्यांदाच MSED चा वीज दर कपातीचा प्रस्ताव; इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग दरात मात्र वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** महाराष्ट्रातील वीज ग्राहकांसाठी आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने पहिल्यांदाच दर कपातीचा प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास साधारणपणे १ ते १५ टक्के वीजदर कपात होणे अपेक्षित आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील दोन कोटींपेक्षा जास्त वीज ग्राहकांना मिळणार आहे. या प्रस्तावानुसार २०२५ – २६ ते २०२९ – ३० या कालावधीमध्ये १२ ते २३ टक्के दर कपात होईल.

राज्यामध्ये १०० पेक्षा कमी युनिट वीज वापरत असलेल्या ग्राहकांना १५ टक्के दर कपातीचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. ही दर कपात २०२५ – २६ या कालावधीत लागू होईल. तर त्या पुढील काळात २०२७ – २८ मध्ये १०० पेक्षा कमी युनिट वीज वापरत असलेल्या ग्राहकांना १९ टक्के दर कपात लागू होईल. तर २०२८ – २९ मध्ये २५% दर कपात करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. सध्या प्रत्येक वीज ग्राहकाला युनिट मागे ५ रुपये १४ पैसे द्यावे लागतात. या प्रस्तावानुसार २०२९ – ३० मध्ये त्याच ग्राहकांना प्रत्येक युनिट मागे २ रुपये २० पैसे द्यावे लागतील. त्यामुळे हा खूप मोठा दिलासा मानला जात आहे.

राज्यातील सर्वसामान्य वीज ग्राहकांप्रमाणेच औद्योगिक ग्राहकांना देखील या माध्यमातून मोठा दिलासा मिळणार आहे. औद्योगिक क्षेत्रातील वीजबिलात दर महिन्याला तीन टक्के कपात करण्याचा प्रस्ताव राज्य सरकार समोर ठेवण्यात आला आहे. तर यामध्ये पाच वर्षांमध्ये ११ टक्क्यांची कपात अपेक्षित आहे. त्यामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्राला देखील मोठा दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्रातून उद्योग बाहेर जाऊ नये यासाठी हा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**शेतकरी वर्गासह सर्व ग्राहकांचा फायदा–**

महावितरणचे स्वतंत्र संचालक व भाजप प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेमुळे पुढील दोन वर्षांत शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार असून घरगुती ग्राहक, औद्योगिक ग्राहक यांनाही मोठा फायदा होणार आहे. सौर उर्जा प्रकल्पांमुळे आगामी पाच वर्षांत १०० युनिटपर्यंत वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे वीज दर ५ रु. ८७ पैसे प्रति युनिटपर्यंत तर १०१ ते ३०० युनिट वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे दर ११.८२ रु. प्रति युनिटपर्यंत टप्प्याटप्प्याने कमी होतील. एक एप्रिल पासून महावितरणच्या घरगुती ग्राहकांना दर कपातीचे लाभ टप्प्याटप्प्याने मिळू लागतील. तसा प्रस्ताव महावितरणने राज्य वीज नियामक आयोगापुढे ठेवला आहे. सरासरी वीज पुरवठ्याचा दर सध्याच्या ९ रु. ४५ पैसे या दरावरून २०२९ –३० पर्यंत ९ रुपये १४ पैसेपर्यंत खाली येणार आहे, असेही ते म्हणाले.

### इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग दरात वाढ करण्याचा प्रस्ताव

सर्वसामान्य ग्राहक आणि औद्योगिक ग्राहक यांना दिलासा मिळणार असला तरी सध्या इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग साठी वापरल्या जाणाऱ्या विजेच्या दरात वाढ करण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. सध्या इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग साठी प्रति युनिट ७ रुपये ३० पैसे इतका दर आकरला जातो. यामध्ये ३५ टक्क्यांची वाढ अपेक्षित असून दर वाढ झाल्यानंतर एका युनिटचा दर ९ रुपये ९६ पैसे इतका असू शकतो.



### सौरचा वापर १६ हजार मेगावॅटपर्यंत नेणार

महावितरण थर्मल पॉवर निर्मित, हायड्रो–इलेक्ट्रिक पॉवर निर्मित वीज खरेदी करते. याशिवाय पवनचक्की व सौर ऊर्जानिर्मित वीजही खरेदी करते. कोळशाची वीज ४ ते ८ रुपये प्रतियुनिट दराने मिळते. तर सौरऊर्जा २.५० ते ३ रुपये प्रतियुनिट दराने मिळते. हळूहळू सरकारला सौरऊर्जेचा वापर १६ हजार मेगावॅटपर्यंत न्यायचा आहे. सौरऊर्जेचा वापर वाढेल तसतशे वीज दर कमी होणार आहेत, असे सांगितले जात आहे.

# राज्य शासनाचा मोठा निर्णय:प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू होणार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई–** राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात आता मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष सुरू करण्यात येणार असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे. याबाबत शासननिर्णय २२ जानेवारी २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. यामुळे आता अर्जाचा पाठपुरवा करण्यासाठी रुग्ण व नातेवाईकांना मंत्रालयात चकरा मारायची गरज पडणार नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील गरजू रुग्णांना अत्यावश्यक आरोग्यसेवा पुरवण्यासाठी, आर्थिक सहाय्य देण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत आहे. तसेच आता प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात हा कक्ष सुरू झाल्यावर नागरिकांचा वेळ व पैसा दोन्ही वाचवता येणार आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी याबाबत माहिती देताना सांगितले, महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली देखील विकसित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चासाठी रुग्णांना संबंधित रुग्णालयामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली एकत्रित जोडण्यात येणार आहेत.



तसेच सध्याच्या कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे. यामुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक सोपी आणि गतिशील होणार आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# टाळ मृदंगाच्या गजरात उद्यापासून तुकाराम महाराज गाथा निरुपण

## उमरीतील श्री संत तुकाराम महाराज मंदिरात वारकऱ्यांची मांदियाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अकोला**


मोठी उमरीतील श्री संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज मंदिरात प्रथम वर्धापन दिनानिमित्त श्री तुकाराम महाराज गाथा निरुपण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताह २६ जानेवारी २ फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. श्री तुकाराम महाराज गाथा निरुपणाचा लाभ आळंदी (देवाची) येथील वारकरी शिक्षण संस्थेचे सुभाष महाराज काळे यांच्या वाणीतून घेता येणार आहे. मोठी उमरीतील रौनक मंगल कार्यालयामागील स्वातंत्र्यसैनिक स्व. जगदेवराव धोत्रे व स्व. कमल ज. धोत्रे लेआऊटमध्ये श्री संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज मंदिर बांधण्यात आले आहे. श्री संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव ३७५ वर्षे व तुकाराम महाराज मंदिर प्रथम वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह होणार आहे. हरिपाठ नेतृत्व मीराबाई सरोदे, विठ्ठल भजनी मंडळ (विठ्ठल नगर), विश्वरुपी सांप्रदायिक महिला भजनी मंडळ



(मोठी उमरी) हे करणार आहेत. भाविकांनी सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्ष गजानन थोरात, उपाध्यक्ष विठ्ठल माहोकार, सचिव देविदास पोटे, सहसचिव मनीष गुजरकर, कोषाध्यक्ष आत्माराम शेळके, कायदेशीर सल्लागार अॅड. संतोष भोरे यांनी केले आहे. २६ ते १ फेब्रुवारीदम्यान दैनंदिन अन्नदाते सेवा अर्पण करणार आहेत. यात श्रीधर पाटील खराबे, भूषण वानखडे, संजय राहुडकर, रवींद्र बकाल, डॉ. राम देवळे, अॅड. अश्विनी देवळे, जानराव परनाटे, रावसाहेब वाकडे, रवींद्र गावंडे, विठ्ठलराव थोटे, दिनकरराव बनसोड, डॉ. सागर थोटे, डॉ. दिनकरराव चांदणे, मुरलीधर धोत्रे, आत्माराम शेळके यांचा समावेश आहे. असा होणार श्रीगणेशा : श्री तुकाराम महाराज गाथा निरुपण व अखंड हरिनाम सप्ताहाचा श्रीगणेशा रविवारी दीपप्रज्वलन सकाळी ११ वाजता होणार आहे. या प्रसंगी श्री गुरु रवींद्र महाराज हरणे (श्री संत मुक्ताई नगर, संस्थान, मुक्ता नगर) उपस्थित राहणार आहेत.

# आकाशात आकर्षक खगोलीय घडामोडी

## ग्रह पाहण्याची खगोलप्रेमींना संधी



**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.२५अमरावती–**

आठवडाभर सूर्याच्या एका बाजूला सर्व ग्रह येत असल्याने दिवसा आकाशात केवळ सूर्य तर रात्री सर्व ग्रह मंडळी एकत्र दर्शनास येत आहेत. आकाशातील बारा राशी पैकी सलग येणाऱ्या कर्क ते धनू या सहा राशी एकदम खाली आहेत. रात्रीच्या प्रारंभापासून पहाटेपर्यंत ग्रह दर्शनाचा लाभ आठवडाभर घेता येईल.

सद्य:स्थितीत पश्चिमेची शोभा वाढवणारा शुक्र व शनी हे दोन्ही एकमेकांजवळ कुंभ राशीत तर सर्वात मोठा गुरु ग्रह, लालसर रंगाचा मंगळ ग्रह आणि सध्या पृथ्वीच्या जवळ आलेले नागरिकांना पाहता येतील. सोबत युरेनस, नेपच्यून दुर्बिणीतून बघता येतील. या कालावधीत दिवसा आकाशात फक्त सूर्य आणि बाकी ग्रह रात्रीचे आकाशात असतील, असे खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी सांगितले.कृष्ण पक्षातील हा अनोखा आकाश नजारा अतिशय दुर्मिळ व डोळ्यांचे पारणे फिटेल, असा आहे. आकाशातील ग्रह ताऱ्यांचा नजारा प्रत्येक मानवी जीवाला भुरळ पाडून जातो. अशातच एखादी अनोखी घटना खूप आकर्षक आणि दीर्घकाळ स्मरणात राहते. दिवसा फक्त सूर्य आणि रात्री सर्व ग्रह अन् तेही रात्रीच्या प्रारंभी व कृष्ण पक्षातील अंधाऱ्या वेळी हा अनोखा आकाश नजारा खूपच सुंदर व मनोवेधक आहे. सूर्यमालेतील सर्व ग्रह स्वत:भोवती फिरत सूर्य प्रदक्षिणा करताना आकाशात आयनिकवृत्त मार्गावरून फिरतात. यालाच राशीचक्र म्हणतात.

आपली पृथ्वी स्वत:भोवती पश्चिम–पूर्व फिरल्याने येणाऱ्या ३० अंशांच्या भागात दिसणाऱ्या तारकांच्या कल्पक आकारांवरून मेष ते मीन अशी बारा राशीची रचना प्रत्यक्ष आकाशात पाहता येते. प्रत्येक ग्रहाचा परिवलन व परिभ्रमण कालावधी वेगवेगळा असल्याने हा सर्व परिवार राशीकात वेगवेगळ्या ठिकाणी असतो. कोणताही ग्रह जेव्हा सूर्य सान्निध्यात येतो. तेव्हा संबंधित ग्रहाचे दर्शन होत नाही यालाच ग्रह अस्त झाला असे समजतात. बुध आणि शुक्र या दोन अंतराळाचे उदयास्त पूर्व किंवा पश्चिमेस होतात. बाकी ग्रह मात्र पूर्वेला उगवून पश्चिमेस मावळतात. सध्या आकाशात गुरू, मंगळ, शुक्र व शनी ग्रह अगदी साध्या डोळ्यांनी दिसत आहे. सायंकाळी पूर्व क्षितीजावर आपल्या सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह गुरू दिसत आहे. त्याच्याजवळ लाल रंगाचा मंगळ दिसत आहे. तसेच पश्चिम क्षितीजावर शुक्र ग्रह दिसत आहे. त्या ग्रहाजवळ शनी ग्रह दिसत आहे.

# गुडमॉर्निंग पथकांची गांधीगिरी; ११७ ग्रामस्थांवर कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती –** उघड्यावर शौचास करणाऱ्या जिल्ह्यातील ११७ नागरिकांना समज आणि पुष्प देऊन गुडमॉर्निंग पथकाने गांधीगिरी दाखविली आहे. १४ पैकी ६ तालुक्यातील पथके सद्या सक्रिय झाले असून आतापर्यंत ३६ गावात सदरची कारवाई करण्यात आली. जिल्ह्यातील काही गावांमध्ये अद्यापही काही नागरिक उघड्यावर बसून गावाच्या सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करित आहे. अशा तक्रारी प्राप्त होताच मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी याची दखल घेत गटविकास अधिकारी यांना पत्राव्दारे जिल्ह्यातील गावांमध्ये उघड्यावर शौचास जात असलेल्या ग्रामस्थांवर स्थानिक दक्षता समिती’ मार्फत ७जानेवारीपासून कारवाई करण्याचे सक्त निर्देश दिले होते, त्यानुसार उघड्यावर शौचास बसणाऱ्या ग्रामस्थांवर प्रथम गांधीगिरी व नंतर दंडात्मक कारवाईचे आदेश दिले. अशातच १४ पैकी सहा तालुक्यांतील पथक गुड मॉर्निंग पथक सक्रिन्य झाले.याअंतर्गत चांदूर रेल्वे, मोर्शी, चांदूरबाजार, तिवसा, भातुकली, नांदगाव खंडेश्वर या ६ तालुक्यातील ३६ गावात गुडमॉर्निंग पथकाने ११७ग्रामस्थांना उघड्यावर शौचास करताना पकडले. त्यांना समज व पुष्प देऊन सोडण्यात आले आहे. फेब्रुवारी व मार्च २०२५ मध्ये मात्र जे ग्रामस्थ उघड्यावर शौचास जातील त्यांचे वर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधिल तरतुदी तसेच मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ११५ ते ११७ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाने ठरविले आहे. ग्रामस्तरावर हगणदारीमुक्त गाव निगराणी समिती स्थापन केली. समितीमार्फत गुडमॉर्निंग उपक्रम राबवण्यात येत आहे.

# यावली शहीदच्या सरपंचपदी शिल्पा खवले, उपसरपंचपदी नितीन पाचघरे

**विदर्भ प्रजासत्ताक**





**दि.२५नांदगाव पेठ –** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जन्मगाव असलेल्या यावली शहीद या आदर्श गावच्या सरपंचपदी शिल्पा तुषार खवले यांची एकमताने निवड करण्यात आली तर उपसरपंचपदी नितीन पाचघरे यांची निवड करण्यात आली.शुक्रवारी निवडणूक निर्णय अधिकारी एस.आर.जोगी यांच्या उपस्थितीत झालेल्या या निवडप्रक्रियेत १३ पैकी दहा सदस्यांनी भाग घेतला होता. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उपस्थितांनी नवनियुक्त सरपंच शिल्पा खवले व उपसरपंच नितीन पाचघरे यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य योगेश निंभोरकर, सुनील देशमुख, स्नेहल यावलीकर, निरंजना मेश्राम, अनिसाबी, करुणा खंडारे, अविनाश वानखडे, वैशाली वानखडे सह ग्रामविकास अधिकारी दिनेश मोहोड उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अजय पाचघरे,प्रकाश वाघमारे, भूषण कांडलकर, नंदा निंभोरकर, अतुल यावलीकर, भूषण खवले, पंकज देशमुख यांनी नवनियुक्त सरपंच उपसरपंच यांचे स्वागत केले.

# मंदिरांच्या जमिनी बेकायदेशीररित्या बळकावण्याचे राज्यात अनेक प्रकार

# अँटी लँड ग्रॅबिंग क्ट लागू करा, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे शासनाला निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती –** राज्यात देवस्थानच्या भूमी बेकायदेशीरपणे बळकावण्याचे प्रकार अनेक ठिकाणी सुरू आहेत. जिल्ह्यासह राज्यात या गैरप्रकाराला आळा बसण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अँटी लँड ग्रॅबिंग (भूमी बळकावणे विरोधी कायदा) कायदा करून तत्काळ कारवाई करावी. तसेच यासाठी राज्यात विशेष पथकाची नेमणूक करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फ त राज्य शासनाला निवेदन दिले आहे.

मंदिरांचे आर्थिक व्यवस्थापन व धार्मिक कार्यासाठी राजे–महाराजे आणि भक्तांनी देवस्थानांना शेतजमिनी दान दिल्या होत्या. तसेच तत्कालीन मंदिर व्यवस्थापनाने काही जमिनी खरेदी केल्या होत्या. या शेतजमिनी पैकी इनाम असलेल्या शेत जमिनीची भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग –२ असल्यामुळे कोणतेही बेकायदेशीर रित्या



हस्तांतरण करता येत नाही. शेतजमिनीच्या कब्जेदारांकडून व भू माफियांच्या हस्तक्षेपामुळे स्थानिक महसूल विभागाच्या काही अधिकाऱ्यांच्या सहाय्याने अनेक देवस्थानांच्या जमिनींचे सातबाऱ्यावरून नाव कमी करून त्या बेकायदेशीरपणे हडपल्या जात असल्याचे गंभीर प्रकार उघड झाल्याचा आरोप मंदिर महासंघाने केला आहे. महाराष्ट्रात कुळ कायद्याच्या तरतुदी लागू झाल्यानंतर देवस्थानच्या बऱ्याचशा जमिनी कुळांनी अथवा त्यांच्या वारसांनी देवस्थान जमिनीवर स्वत:चे नाव महसूल विभागातील संबंधित अधिकारी तसेच संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या मदतीने बेकायदेशीररित्या लावून घेत देवस्थानांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केले आहे. त्यामुळे कुळ कायद्यांतर्गत देवस्थान शेत जमिनीचे प्रकरण महसूल विभागासमक्ष कार्यवाहीकरिता आल्यास त्याबाबतची नियमावली सुद्धा महसूल विभागाला ठरवून देणे आवश्यक आहे. जेणेकरून आजपावेतो देवस्थान शेत जमिनीच्या कुळ कायद्या अंतर्गतच्या प्रकरणात महसूल अधिकाऱ्यांद्वारे होणाऱ्या अनियमिततेला आळा बसेल. देवस्थानांच्या जमिनी हडपण्याचे गैरप्रकार झालेले असून, असे प्रकार अद्यापही सुरू आहेत. या प्रकारे जमीन हडपण्याची प्रकरणे स्पष्टपणे लँड ग्रॅबिंग या सज्ञेत मोडतात. परंतु पुरोगामी महाराष्ट्रात लँड ग्रॅबरांना म्हणजेच जमीन हडपणाऱ्यांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा लॅन्ड ग्रॅबरद्वारे देवस्थान जमीन हडप प्रकरणात त्यांना कायदेशीर फौजदारी स्वरूपाची शिक्षा होण्याकरिता सक्षम कायदा करण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाने निवेदनातून केली आहे. या वेळी महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल, जिल्हा हिंदू संघटक प्रदीप गर्गे, सोमेश्वर महादेव संस्थानचे राजेश असोरिया, ड. अभिजित बजाज, हिंदू जनजागृती समितीचे संजय चौधरी, रोशन मुळे आदी मंदिर विश्वस्त उपस्थित होते.

# गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५चिखलदरा**

संपूर्ण राज्याला हादरून सोडणाऱ्या मेळघाटातील रेट्याखेडा येथील वृद्ध महिलेवर अमानवीय अत्याचार आणि धिंड काढल्याच्या प्रकरणाची गंभीर दखल घेत मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मुंबई येथे भेट घेतली. या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनाही त्यांनी पत्र दिले. गुन्हेगार व त्यांना पाठीशी घालणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात ठाणेदार व जमादारावर कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे.



मेळघाट विधानसभा मतदारसंघातील चिखलदरा तालुक्यातील रेट्याखेडा येथील काळमी नंदराम शेलूकर (वय ७७) या आदिवासी वृद्धेला पोलिस पाटील व अन्य नागरिकांनी जादूटोण्याचा आळ घेत तिला दोरखंडाने बांधून मारले. तिला गरम साखळीचे चटके, मिरचीची धुरी दिली व तोंडाला काळे फासले. डोक्यावर गाठोडे देऊन मारहाण करीत गावातून बेदखल केले.

**पालकमंत्र्यांकडून गंभीर दाखल**

घटनेनंतर याची माहिती आमदार केवलराम काळे यांना मिळताच त्यांनी संबंधित ठाणेदार व जमादाराला फोनवर गंभीर प्रकरण सांगत तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाईचे आदेश दिले. परंतु, त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले. या बाबीची पालकमंत्र्यांनी गंभीर दखल घेतली आहे.

**ठाणेदारावर मेहरबान कोण?**

फिर्यादीने सांगितले नसल्याचे अगोदर पोलिसांनी वरिष्ठांना कळविले. परंतु, ५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष आ. केवलराम काळे यांनी फोनवर सांगूनही १८ दिवस चौकशी केली गेली नाही. लोकमतमध्ये वृत्त प्रकाशित झाल्यानंतर महाराष्ट्रात खळबळ उडाली. त्यानंतर गुन्हे दाखल करून आरोपींना अटक करण्यात आली.

## युवक काँग्रेसच्या प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी शिवराज मोरे यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

मोहन भागवत यांच्या वक्तव्याविरोधात नागपुरात युवक काँग्रेसने केलेले आंदोलनानंतर ६० पदाधिकाऱ्यांना पदमुक्त करण्यात आल होतं. त्यानंतर युवक काँग्रेसचा अंतर्गत वाद हा चव्हाट्यावर आला होता.

युवक काँग्रेसमधील हा अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्यानंतर युवक काँग्रेसच्या प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी शिवराज मोरे यांची निवड करण्यात आल्याने त्यांचे सर्वच स्तरावरून कौतुक होत आहे.

# वय वर्षे सतरा; मोबाईल हिसकावले अठरा

## मोबाईल स्नॅचिंग करणारी अल्पवयीनांची गँग ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

रात्रीच्या वेळेस रस्त्याने मोबाईलवर बोलत पायी फिरणाऱ्या लोकांच्या मागून भरधाव वेगाने बाईकने येऊन त्यांच्या हातातील मोबाईल फोन जबरीने हिसकावून पळ काढणाऱ्या आठ जणांच्या अल्पवयीनांच्या गँगचा राजापेठ पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. त्या आठ विधीसंघर्षित बालकांकडून ७१ हजार रुपये किमतीचे सात मोबाईल व गुन्हयात वापरलेल्या २.८० लाख रुपये किमतीची एक बाईक व तीन मोपेड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राजापेठचे ठाणेदार पुनित कुलट यांच्या नेतृत्वातील डीबी स्कॉडने २३ जानेवारी रोजी ही मेगा कारवाई केली.

राजापेठ पोलिस ठाण्यात यंदा नोंद असलेल्या मोबाईल स्नॅचिंगच्या दोन घटनांचा तपास करत असताना महेंद कॉलनी येथील चार, शाम नगर येथील तीन व भातकुली पंचायत समिती परिसरात राहणाऱ्या एका विधी संघर्षग्रस्त बालकांनी राजापेठ व चार, फेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून पत्येकी चार व गाडगेनगर हद्दीतून दोन असे दहा मोबाईल फोन जबरीने चोरी केल्याबाबतची माहिती राजापेठ पोलिसांना मिळाली. त्यांना मोठ्या शिताफीने ताब्यात घेण्यात आले. तुर्तास त्यांच्याकडून सात मोबाईल व दुचाकी जप्त करण्यात आल्या असल्या तरी तपासादरम्यान मोबाईल स्नॅचिंगचे आणखी काही गुन्हे उलगडण्याची शक्यता असल्याची माहिती राजापेठ पोलिसांनी दिली. चैनीसाठी ती अल्पवयीनांची टोळी मोबाईल हिसकावत असल्याची माहितीदेखील समोर आली आहे.

# योजनेचा लाभ घेणाऱ्या बोगस लाभार्थ्यांची आता खैर नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**




शासनाकडून विविध योजनांतर्गत निराधार लाभार्थ्यांना दरमहा अनुदान दिले जाते. रकमेचा या निराधारांना मोठा हातभार लागतो. मात्र, तालुक्यात शासनाच्या या योजनांचा अनेक बोगस लाभार्थी लाभ घेत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा लाभार्थ्यांचा शासनातर्फे शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले असून, बोगस लाभार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे निराधार योजनेच्या नावाखाली लाभ घेणाऱ्याबोगस लाभार्थ्यांची आता खैर नसल्याचे दिसून येत आहे.संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी अपंग योजना, इंदिरा गांधी विधवा योजना, श्रावणबाळ योजना व इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना इत्यादी योजनांच्या लाभार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून शासनाने लाभार्थ्यांना मिळणारे दरमहा अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्याबाबत निर्देश दिले आहे. सर्व लाभार्थ्यांनी स्वतःचे आधारकार्ड त्यांनी दिलेल्या बँक खात्याशी संलग्न असणे अत्यावश्यक आहे. ज्यांचे संलग्न नाही, अशांना लाभमिळणार नाही.

**आधार खात्याला संलग्न नाही**

तहसील कार्यालय जिवतीअंतर्गत संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी अपंग योजना, इंदिरा गांधी विधवा योजना, श्रावणबाळ योजना व इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेचा लाभघेणाऱ्या अनेक लाभार्थ्यांनी स्वतःचे आधारकार्ड त्यांनी दिलेल्या बँक खात्याशी संलग्न केलेले नाही. त्यामुळे संबंधित योजनेचे लाभार्थी दरमहा मिळणाऱ्या अनुदानापासून वंचित राहू नये म्हणून लाभार्थ्यांनी आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न करावे, असे आवाहन आहे.

## खासदार संजय राऊत आज नाशिक दौऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५मुंबई**


शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आज नाशिक दौऱ्यावर

विधानसभा निवडणुकीनंतर संजय राऊत यांचा पहिलाच नाशिक दौरा संजय राऊत यांच्या उपस्थितीत नाशिकमधील ठाकरे गटाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक विधानसभा निवडणुकीतील पराभवाचं मंथन करण्याबरोबरच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत घेणार बैठक मागील काही दिवसांपासून नाशिकमधील ठाकरे गटाचे अनेक नेते शिंदे गटासह भाजपमध्ये जाण्याच्या सुरू आहे.

# गोवऱ्यांचा धूर, रोडग्याचा खमंग स्वाद, अन वांग्याची झणझणीत भाजी...ऋणमोचन यात्रेत भाविकांची पर्वणी!

## ऋणमोचनच्या यात्रेत रविवारी उसळणार जनसागर! पौष महिन्यातील शेवटचा रविवार पूर्णेला पाणी, भाविकांची स्नानाची इच्छा पूर्ण होणार!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५भातकुली**






उद्या दिनांक,२६ जानेवारीला पौष महिन्यातील शेवटचा रविवार असल्याने विदर्भासह राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र ऋणमोचन येथे मुदगलेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांचा जणसागर उसळणार आहे. यावर्षी यात्रेदरम्यान पूर्णा नदीला मुबलक पाणी असल्याने भाविक अंघोळीचा आनंद घेत असून ओल्या अंगाने मनोभावे मुदगलेश्वराची पूजा अर्चा करतांना दिसून येत आहे. तर, गोवऱ्यांच्या धुरातील रोडग्याचा खमंग स्वाद, अन वांग्याची झणझणीत भाजीवर अनेक भाविक ताव मारणार आहे. ब दर्जा असलेल्या भातकुली तालुक्यातील श्रीक्षेत्र ऋणमोचन येथे मुदग्लेश्वराचे (महादेव) देवस्थान असून पुरातन आहे. कर्मयोगी गाडगेबाबा यांनी गृहत्यागानंतर खरी सेवाकार्याची मुहूर्तमेढ ऋणमोचन येथेच रोवली होती. खऱ्या अर्थाने ऋणमोचन ही त्यांची कर्मभूमीच! भातकुली, दर्यापूर व मूर्तिजापूर या तीन तालुक्याच्या सिमेवर व अर्ध चंद्राकृती पूर्वाभिमुख वाहणाऱ्या पूर्णा नदीच्या काठावर वसलेले श्रीक्षेत्र ऋणमोचन विदर्भासह राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. पश्चिम विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यात श्रीक्षेत्र ऋणमोचन येथे श्रीमुदग्लेश्वराचे (शिवलिंग) पुरातन देवस्थान आहे. विदर्भातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या तीर्थक्षेत्री पयोष्णी (पूर्णा) नदी पूर्वाभिमुख व अर्धचंद्राकृती वाहत असल्याने या तीर्थक्षेत्राला हिंदू संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. या नदीच्या काठावर मुदगलेश्वराचे एक छोटेसे मंदिर आहे. भगवान शंकराचा (महादेव) दिवस सोमवार असला तरी, येथील मुद्गलेश्वराचा दिवस मात्र पौष महीण्यातील रविवार आहे. त्यामुळे येथे भाविकांची पौष महिन्यात मोठी गर्दी होते. शेकडो वर्षापासून येथे पौष महीण्यात मोठी यात्रा भरते. ती रथसप्तमीपर्यंत असते. पौष महीण्यातील रविवारी पूर्णा नदीत अंघोळ करुन ओल्या अंगाने तांब्याच्या अकरा गडवे टाकून मुद्गलेश्वराचा जलाभिषेक व बेलपत्री वाहण्याची प्रथा आहे. उद्या दिनांक २६ जानेवारीला पौष महिन्यातील शेवटचा रविवार असल्याने व पूर्णा नदीला यावर्षी पाणी मुबलक असल्याने भाविक मोठ्या संख्येने स्नानाचा आनंद घेणार आहे. त्यामुळे त्यांची इच्छा पूर्ण होणार आहे. त्यांच्यासाठी ती पर्वणीच ठरणार आहे. त्यामुळे ऋणमोचन येथे रविवारी भाविकांचा जनसागर उसळणार आहे.

# मालखेड शिवारात बिबट्याचा धुमाकूळ; बकरीची शिकार

## हिंस्त्र पशुंकडून हल्ल्यांनी पशुपालक हैराण, दहशत वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५चांदुर रेल्वे**



चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्याचिरोडी वर्तुळातील लालखेड बीटलगत मालखेड गावानजीकच्या शिवारात चार ते पाचवर्षीय गर्भवती बकरीची बिबट्याने शिकार केली. ही घटना शुक्रवारी उघडकीस आली. हिंस्त्र पशुंकडून पाळीव जनावरांवर होणाऱ्या सततच्या हल्लयांमुळे परिसरातील पशुपालक हैराण झाले आहेत.शिकार झालेली बकरी मालखेड येथील रहिवासी शेख सलीमयांच्या मालकीची आहे. शिवारात बकऱ्यांचा कळप चरत असताना बिबट्याने कळपातील बकरीवर झडप घालून जागीच ठार केले. चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार यांना माहिती मिळताच चिरोडी वर्तुळ अधिकारी प्रकाश करे, लालखेड बीट वनरक्षक रूपाली वऱ्हाडे, वनमजूर विनायक लोणारे यांनी घटनास्थळ गाठून घटनास्थळाचा पंचनामा केला. पशुमालक शेख सलीम यांनी चिरोडीवनविभागाकडे नुकसानभरपाईसाठी अर्ज केला आहे. परंतु, पशुपालकांमध्ये बिबट्याची दहशत निर्माण झाली आहे. पोहरा-चिरोडी जंगलातील मुक्त विहार करणाऱ्या बिबट्याची नजर पाळीव प्राण्यांवर आहे.

# आता कृषि योजनांच्या लाभासाठी शेतकरी ओळख क्रमांक

## सीएससी केंद्रावर काढता येणार ओळख क्रमांक : जिल्ह्यात ग्रीस्टॅक योजना राबविण्यास मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**




अमरावतीजिल्ह्यात केंद्र शासनाची ग्रीस्टॅक ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाच्या सर्व योजनांचे लाभ आणि सहभाग मिळविण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक मिळविणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नागरी सुविधा केंद्रातून शेतकरी ओळख क्रमांक काढावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.ॲग्रीस्टॅकच्या माध्यमातून कृषि क्षेत्रातील डेटा आणि डिजीटल सेवांच्या उपयोगाने शासनाच्या विविध योजना लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यत पोहोचण्यात येणार आहे. ॲग्रीस्टॅक अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी ओळख क्रमांक देण्याची सुविधा नागरी सुविधा केंद्रात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी नागरी सुविधा केंद्रात सातबारा, आठ अ आणि आधार क्रमांकाशी संलग्न असलेला मोबाईलसह संपर्क साधणे आवश्यक आहे. नोंदणी करताना आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकावर ओटीपी येणार आहे. ओटीपी नमूद केल्यानंतरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. नोंदणी झाल्यावर शेतकरी ओळख क्रमांक त्याच मोबईल क्रमांकावर प्राप्त होणार आहे.शेतकरी ओळख क्रमांक अत्यंत महत्वाचा असून शेतकऱ्यांनी जपून ठेवणे आवश्यक आहे. भविष्यात शेतकऱ्यांसाठीच्या योजनांचा लाभ शेतकरी ओळख क्रमांकानुसार शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. भविष्यातील प्रत्येक योजनेमध्ये सहभागी अथवा लाभ मिळविण्याकरीता शेतकरी ओळख क्रमांक आवश्यक असणार आहे.कृषि क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण योजना योग्य व पात्र लाभार्थ्यांपर्यंत जलद गतीने पोहचवून कृषि क्षेत्राचा विकासासाठी ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्राधान्याने शेतकरी ओळख क्रमांक काढावा, अडचण आल्यास गावाच्या तलाठ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मध पिकवा अन् उत्पादनही वाढवा!मधुमक्षिका मंडल, फलोत्पादन अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शेतीच्या उत्पादनाची वाढ ही मधमाश्यांवरही अवलंबून आहे. मधमाश्या अप्रत्यक्षपणे फुलोऱ्यातील पराग सिंचनाने (परागीभवनाने), पिकामध्ये वाढ होण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. चांगली फळे झाडाला लागावी किंवा सुधारित, चांगल्या प्रतीचे पीक यावे, याकरिता जे परागीभवन व्हावे लागते ते कीटकांवर अवलंबून असते.

राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळ आणि महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषध वनस्पती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात मधमाशा पालकांसाठी राष्ट्रीय मधुमक्षिका पालन आणि मध अभियान राबविले जात आहे. यासाठी पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. मधमाश्या फुलांमधील मकरंदाचे मधामध्ये रूपांतरण करतात आणि त्यांना पोळयाच्या कप्प्यांमध्ये साठवून ठेवतात. जंगलामधून मध गोळा करण्याचा उद्योगदीर्घकाळापासून



अस्तित्वात आहे; परंतु मधमाश्यांना न जाळता कोणतीही दुखापत न पोहोचवता तांत्रिक पद्धतीने मधुमक्षिका पालन केल्यास त्यामधून मध आणि इतर पदार्थ गोळा करून या व्यवसायाला आर्थिक पाठबळ देता येऊ शकते. मध आणि त्यापासून बनवलेल्या उत्पादनांची बाजारपेठेतील मागणी वाढत असल्याने मधमाशी पालनाचा उद्योग भविष्यात फायदेशीर ठरेल.

**काय काळजी घ्यावी?**

कीटकनाशके, प्रदूषण, धूर आदी क्षेत्रांपासून मधपेट्या दूर ठेवाव्यात. बदलत्या ऋतूंप्रमाणे पराग व मकरंद उपलब्ध होईल असे ठिकाण निवडावे. माकडे, अस्वले, साप, बेडूक, पक्षी, मुंग्या आणि वाळवी या प्राण्यांपासून उपद्रव होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**काय आहे लाभार्थी पात्रता?**

ज्या शेतकऱ्यांनी मधुमक्षिका पालनाचे प्रशिक्षण घेतले आहे, त्यांना प्राधान्य दिले जाते. शेतकरी, महिला, महिला बचत गट, अनुसूचित जाती/जमाती शेतकरी गट, सुशिक्षित बेरोजगार युवकांचे गट यांना प्राधान्य.लाभार्थीकडे स्वतःची जमीन असणे आवश्यक आणि त्यावर मधुमक्षिका पालनास सहयोगी फलोद्यान पिकांची लागवड असावी.

# राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांचा दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती,**



सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, मृद व जलसंधारण, आदिवासी विकास व पर्यटन राज्यमंत्री इंद्रनिल नाईक जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दौऱ्यानुसार, राज्यमंत्री श्री. नाईक यांचे शनिवार, दि. २५ जानेवारी रात्री ९ वाजता अमरावती येथील सर्कीट हाऊस येथे आगमन होईल. रविवार, दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१० वाजता जवाहरलाल नेहरु स्टेडियम येथे आयोजित ध्वजवंदन कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता अमरावती येथून पुसदकडे रवाना होतील.

# अमरावती शहरात जिल्ह्यात त्रिशूलच्या नावावर शस्त्रांच वाटप

## काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांचा खळबळ जनक आरोप पत्रकार परिषद दाखवले त्रिशूलधारी शस्त्राचे फोटो



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील व शहरात देखील मोठ्या प्रमाणात त्रिशूल च्या नावावर शस्त्रांचा वाटप होत आहे, त्रिशूलच्या नावावर जिल्ह्यात ग्रामीण भागात आणि शहरात गुप्त्यांचा वाटप होत आहे असा आरोप काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी केला आहे,

या शस्त्रांचा वापर चुकीच्या पद्धतीने करण्यात आला तर त्याला जबाबदार कोण असा देखील सवाल यशोमती ठाकूर यांनी अमरावतीत पत्रकार परिषदेत करत या त्रिशूलांचे शस्त्र फोटो पत्रकार परिषदेत दाखवले...राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गृहमंत्री असताना या गोष्टी कसा घडतात असा देखील सवाल यशोमती ठाकूर यांनी केला.या सर्व शस्त्र वाटपाची माहिती आपण अमरावतीचे पोलीस अधीक्षक व पोलीस आयुक्त यांना व्हाट्सअप वरून दिल्याचा देखील यशोमती ठाकूर यांनी सांगितलं..उद्या यामधून जर गुन्हेगारी घडली तर याला जबाबदार कोण असा प्रश्न करत हे थांबवण्याचं आवाहन यशोमती ठाकूर यांनी केले.

# संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी तूर फेकली रस्त्यावर

## तुर भाववाढीच्या बाबत प्रचंड घोषणाबाजीने संतप्त शेतकऱ्यांनी परिसर सोडून दणाणून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५बहीरम**

दिनांक २४ जानेवारी २०२५ हा दिवस सन १९७५ च्या बहिरम येथील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या रणसंग्रामाचा स्मृतिदिनदिनांक २४ जानेवारी १९७५ रोजी बहिरम येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापसाने भरलेल्या पंधराशे बेलबंड्या घेऊन आंदोलन केले होते, त्यामध्ये जवळापूर येथील शेतकरी श्री विठ्ठलराव दुतोंडे पोलीस गोळीबारात शहीद झाले होते, व शेकडो शेतकरी जखमी झाले होते, करिता गेल्या १७ वर्षापासून युवा व शेतकरी चळवळीतील नेते प्रकाश साबळे व सुधाकरराव हावरे हे समस्त शेतकरी बांधवांना घेऊन २४ जानेवारी या दिनी शहीद शेतकऱ्यांना व दिवंगत शेतकरी नेतृत्वांना श्रद्धांजली अर्पण करतात,

२४ जानेवारी चे औचित्य साधून शेतकऱ्यांची चळवळ जिवंत राहावी व शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या



भावांकडे शासनाचे लक्ष केंद्रित व्हावे यासाठी तुरीच्या भावामध्ये प्रचंड घसरण झाल्यामुळे चिंता तूर असलेल्या तुर उत्पादक शेतकऱ्यांसाठी चिंतातुर तुर उत्पादक शेतकरी परिषद शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये दिन.२४ जानेवारी २०२४ मध्ये बहिरम येथे संपन्न झाली.

सदर परिषदेचे अध्यक्ष प्रगतशील शेतकरी जानराव पाटील तसेच प्रमुख मान्यवरांमध्ये रामदासजी भोजने, मुकुंदराव उभाड, प्रकाश साबळे, सुधाकररावजीहावरे ,राजाभाऊ बोबडे, गोपाल भालेराव , रविभाऊ खंडेलवाल,राजीकभाई आदी मंडळी उपस्थित होती.

१९७५ चे बहिरम कापूस आंदोलन शेतकऱ्यांचे हक्क व अधिकाराची जाणीव निर्माण करणारे केंद्र असल्याचे प्रतिपादन प्रकाश साबळे यांनी व्यक्त केले..

शेतमालाच्या भावामध्ये होत असलेली प्रचंड घसरण विशेषतः कापूस व तूर शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे होणारी बाब असून सरकारने कापूस व तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या भावा संदर्भात संवेदनशीलता दाखवण्याची गरज असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

उपस्थित शेतकरी बांधवांनी शहीद शेतकरी स्व. विठ्ठलराव दुतोंडे व दिवंगत शेतकरी नेते स्व. भाऊसाहेब साबळे, स्व.दादासाहेब हावरे, स्व. शंकरराव बोबडे, स्व. मामराज खंडेलवाल, स्व.केशरकाकू सिकची, स्व. वामनराव खलोकार यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली.बहिरम कापूस आंदोलनातील श्री जानराव पाटील, श्री सुधाकरराव हावरे, श्री निलेश दूतोंडे, श्री रवी भाऊ खंडेलवाल यांचा युवा शेतकरी नेते श्री प्रकाश साबळे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार केला...

याप्रसंगी सूत्रसंचालन विपुल चौधरी तसेच आभार प्रदर्शन शेतकरी नेते गोपाल भालेराव यांनी केले, निलेश दुतोंडे, श्री अरुण पटोकार,शशिकांत बोंडे, अमित कुचे ,गोपाल महल्ले, अनुला खान, मनीष हावरे, अजयराव कडू, योगेश बोबडे,अक्षय साबळे, योगेश मोहोळ, राहुल सोलव, विजय राऊत आदी शेतकरी मंडळींनी सदर सभेच्यायशस्वीतेसाठी सहकार्य केले.

# विविध उपक्रमांनी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

## मतदार नोंदणी करणाऱ्यांचा सत्कार नवमतदारांचा निवडणूक ओळखपत्र वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

तहसील कार्यालयामध्ये १५ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त कार्यक्रम पार पडला. यात विविध घटकांमध्ये मतदान जागृती करून मतदार नोंदणी केलेले नागरीक आणि नवमतदारांना निवडणूक ओळखपत्र वाटप करण्यात आले.



उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसिलदार विजय लोखंडे, निलेश खटके, प्रशांत पडघन, प्रा. एन. पी. सिनकर, प्रा. डॉ. बबीता येवले, सारंग ढोमसे आदी उपस्थित होते.

श्री. शिंदे यांनी, मतदान प्रक्रियेत तरूणांचे महत्व अधिक आहे. देशात तरूणांना मिळालेल्या मतदानाच्या अधिकारामुळे त्यांची निर्णायक भूमिका आहे. आपल्याला मिळालेली लोकशाही ही आपले भाग्य आहे. अनेक देशात विविध शासन व्यवस्था आहे. आपण लोकशाही व्यवस्थेत राहतो, त्यांची फळे आपण पाहतो आहे. त्यामुळे मिळालेली लोकशाही टिकवावी लागणार आहे. संविधानाने मिळालेली लोकशाहीने देशाच्या विकासासत फार मोठे योगदान दिले आहे. संविधानाने दिलेली लोकशाही टिकविण्याची जबाबदारी तरूणांवर आहे. आता घरबसल्या मतदार नोंदणी करण्याची सोय आहे. त्यामुळे तरूणांनी नोंदणी करून मतदान करण्यासाठी पुढे यावे. ग्रामीण आणि अल्पशिक्षीत भागात मतदान अधिक प्रमाणात होते, मात्र शहरी किंवा उच्चशिक्षीत भागात कमी होत असलेले मतदान चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले.श्री. भटकर यांनी प्रास्ताविकातून मतदारयादीत नोंदणीबरोबरच मृत्यू किंवा त्याठिकाणी राहत नसलेल्या नागरिकांचे नावे वगळणेही आवश्यक आहे. नवमतदारांनी मतदार नोंदणी करावी, तसेच मतदान आवश्य करावे असे आवाहन केले.

श्री. सिनकर यांनी मतदान अभियानात तरूणांनी सहभागी व्हावे. तसेच मतदान करून मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन केले.श्रीमती येवले यांनी आपल्याला मतदानाचा हक्क सहज मिळाला आहे. हा हक्क अबाधित राहावा यासाठी ती टिकवून ठेवणे आपली जबाबदारी आहे. लोकशाहीचे भवितव्य तरूणांवर अवलंबून असल्याचे सांगितले.

यावेळी मतदान प्रक्रियेत उत्कृष्ट कार्य करणारे रघूनाथ वारे, स्मिता साठे, अजय बनारसे, प्रा. विश्वास जाधव, विजय वानखेडे, सैयद नासिर, प्रसन्न पंत, मिनाक्षी बाहेकर, जयप्रकाश त्रिपाठी, धमेंद्र कथलकर, समीर वडनेरकर, दिपक यादव, कल्पना भुयार, सुनिता कापसे, रेखा ब्राम्हणकर, शेख मुजीमुद्दीन, राजेश गावंडे, हेमलता पाटणकर, नितीन अविनाशे, जयंत सराटकर, संजय मडके, प्रमोद विजयकर, राजेश तुपोने, जिल्हा निवडणूक कार्यालयाचे प्रविण देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचा व्हीडीओ संदेश दाखविण्यात आला. उपस्थितांना मतदानाबाबतची शपथ देण्यात आली. नवमतदारांना निवडणूक ओळखपत्र वाटप करण्यात आले.

# खबरदार ! परीक्षेत विद्यार्थ्याकडे मोबाईल आढळल्यास दोन वर्षाची बंदी घातली जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

दहावी व बारावीच्या परीक्षा विद्यार्थी व त्यांच्या पालकांनाही महत्त्वाच्या ठरतात. पुढील दिशा ठरविणाऱ्या या परीक्षा चोख पार पडाव्या म्हणून शिक्षण मंडळे सर्व ती खबरदारी घेत असतात. पण तरीही काही गैरप्रकार तांत्रिक सहाय्य घेत होतच असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने मोबाईलच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका फुटण्याचे गैरप्रकार घडल्याचे उघडकीस आले आहे. आता त्यावर कडक उपाय शोधण्यात आला आहे. तो दंडात्मक स्वरूपाचा आहे.



केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सेंट्रल बोर्ड सेकंडरी एज्युकेशनतर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सूरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर या सीबीएससीतर्फे विद्यार्थी व पालकवर्गासाठी काही मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केली आहेत. जर विद्यार्थ्याने या मार्गदर्शक तत्वचे पालन केले नाही तर तर त्यास दोन वर्षाची बंदी घातली जाणार. असा विद्यार्थी दोन वर्ष सदर परीक्षेस बसू शकणार नाही. म्हणजे मोबाईल व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरण वापरण्यास मनाई आहे. जर कोणताही विद्यार्थी असे उपकरण उपयोगात आणतांना दिसला तर त्याला पुढील दोन वर्ष परीक्षेस बसता येणार नाही. या पूर्वी बंदी होतीच. पण ती एक वर्षाची होती. आता दोन वर्षाची तरतूद करण्यात आली आहे.

मंडळाचे परीक्षा नियंत्रक डॉ. संयम भारद्वाज यांनी ही बाब स्पष्ट केली. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक उपकरण किंवा मोबाईल फोन वापरले किंवा जवळ ठेवले तर विद्यार्थी केवळ यावर्षीच नव्हे तर पुढील वर्षीही परिक्षेला बसू शकणार नाही. परीक्षा पारदर्शक होण्यासाठी परीक्षा केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावल्या जाणार असल्याचे ते म्हणाले. परीक्षेशी संबंधीत खोट्या अफवा पसरविण्याचे प्रकार सोशल मिडियावर यापूर्वी घडले आहे. म्हणून केंद्रीय मंडळाने सोशल मिडियावर परिक्षेशी संबंधीत खोटी माहिती देण्याचे कृत्य अनूचीत ठरविले आहे. म्हणजे अशी बाब दिसून आल्यास अनूचीत साधन नियमांतर्गत कारवाई केल्या जाईल.

# सायन्सकोर मैदानात सुरु असलेल्या मिनी सरस प्रदर्शनीला अमरावतीकरांचा प्रचंड प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

बचतगटांच्या विविध समुहांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याकरिता दरवर्षी प्रदर्शनी घेऊन तसेच इतर जिल्ह्यातील प्रदर्शनीमध्ये स्थानिक बचतगटांना स्थान देण्याचे काम उमेदने केले आहे. अशातून महिला ह्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असून खऱ्या अर्थाने काही बचतगटातील महिलांनी या विविध गृह व्यवसायात भरारी घेतली आहे. शक्रवारी या प्रदर्शनीचे थाटात उदघाटन झाल्यानंतर सायंकाळी या प्रदर्शनीला अमरावतीकरांनी भरघोस असा प्रतिसाद दिला असल्याचे चित्र पहावयास मिळाले.

सायन्सकोर स्थित या प्रदर्शनीमध्ये जिल्ह्यातील ६५ स्वयं सहाय्यता समूह तसेच इतर जिल्ह्यातील १० स्वयं सहाय्यता समूह असे एकूण ७५ समूहाचे स्टॉल लावण्यात आले आहे. या प्रदर्शनीमध्ये ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहाद्वारे उत्पादित विविध खाद्य पदार्थ, तसेच इतर आकर्षक वस्तू नागरिकांना खरेदी करिता ठेवण्यात आल्या आहे. विदर्भातील ग्रामीण भागातील मुख्य आकर्षण असलेल्या खाद्यपदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. २८ जानेवारी पर्यंत हे प्रदर्शन चालणार असून नागरीकांना याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रामिण विकास यंत्रनेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांनी केले.

## चिखलदऱ्याच्या स्ट्रॉबेरी,रबडी बासुंदी च्या स्टोल वर गर्दी

अमरावती जिल्ह्यातील चिखलदऱ्याची तर स्ट्रॉबेरी उत्पादक शहर म्हणूनच ओळख समोर येत आहे. शेतकरी आता पारंपरिक पिकांपेक्षा नगदी पिकांवर भर देत आहे. यातूनच स्ट्रॉबेरीच्या क्षेत्रात वाढ होत आहे. शिवाय तीन महिन्यात अथक परिश्रम घेऊन उत्पादन पदरी पाडायचे हा निर्धारच शेतकरी करीत आहेत. दोन महिन्याचे योग्य नियोजन करुन चिखलदरा आणि नजिकच्या गावातील ५० शेतकऱ्यांनी हा यशस्वी प्रयोग केला आहे. आणि तीच चिखलदऱ्याची स्ट्रॉबेरी या मीनी सरस प्रदशनीमध्ये विक्री साठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.या सोबतच बासुंदी,कलाकंद आणि रबडी अमरावतीकरांच्या पसंतीस उतरले आहे.



# सोमवारी जिल्हा मराठी पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा

## ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित होणार : श्रीमंत माने यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार : विभागीय व जिल्हास्तरीय पुरस्कारही प्रदान केले जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २५ अमरावती**

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या जेष्ठ व मान्यवर पत्रकारांचा विविध पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार आहे. सोमवार, २७ जानेवारी रोजी, दुपारी ४ वाजता हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सोमेश्वर पुसदकर ऑडिटोरियममध्ये हा पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार व स्तंभलेखक भाऊ तोरसेकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तर दै. लोकमतचे नागपूर आवृत्ती संपादक श्रीमंत माने यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष



अनिल अग्रवाल हे राहतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री बच्चू कडू आणि श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ उपस्थित राहणार आहेत. समारंभात ज्येष्ठ पत्रकार व स्तंभलेखक भाऊ तोरसेकर यांना स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह व ४१ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. दै. लोकमतचे नागपूर आवृत्तीचे संपादक श्रीमंत माने यांना स्व. जुगलकिशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान केला जाईल. सन्मानचिन्ह आणि ३१ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार दै. अमरावती मंडलने पुरस्कृत केला आहे.दैनिक भास्करच्या नागपूर येथील उपसंपादक गीता तिवारी यांना विभागीय स्तरावरील पत्रकारिता पुरस्काराने गौरविले जाणार आहे. राहुल गडपाले यांनी हा पुरस्कार पुरस्कृत केला आहे. २१ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी सुरेंद्र चापोरकर यांना दैनिक विदर्भ मतदार पुरस्कृत जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार तर दैनिक देशोन्नतीचे धामणगाव रेल्वे येथील प्रतिनिधी मंगेश भुजबळ यांना दैनिक जनमाध्यम पुरस्कृत जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप सन्मानचिन्ह व ११ हजार रुपये रोख असे आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.